किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL EC...
2/8/08

३ ● मूलगामी
५ ● मलेशियापुढे आव्हान वांशिक सलोख्याचे
१३ ● 'शांततेच्या घटना'त्मक पेचात जपान
१९ ● युरोपमध्ये चर्चा 'धोक्या'ची
२३ ● जिकडेतिकडे (विज्ञान-तंत्रज्ञान)
२७ ● अर्थबोधपत्रिका पुरवणी
भाववाढ नेमकी किती ?....कशामुळे....?

खंड ७ : अंक ५ ऑगस्ट २००८

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका' दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.**


**वर्गणीसाठी पत्ता :**

**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल: ispe@vsnl.net, ispe@vsnl.com



**अर्थबोधपत्रिका**

**खंड ७ (अंक ५) ऑगस्ट २००८**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


### *'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?*

- उद्बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- नि:पक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक
- हाताशी असणाऱ्या मोजक्याच वेळात जगाबद्दलचे भान वाढविणारी

### *'अर्थबोधपत्रिके'चा हेतू*

प्रतिष्ठित व अग्रगण्य नियतकालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यत: इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.

### *'अर्थबोधपत्रिका'कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

---

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# मूलगामी

पाया मजबूत असला तर इमारत कोसळण्याची शक्यता नसते, असे म्हणतात. त्यामुळे बांधकाम करताना पायाकडे बारकाईने लक्ष द्यावे लागते. कारण मजल्यांवर मजले उभे राहू लागले की पायात बदल करता येत नाही. समाजजीवनातही मूल्यांचा/नियमांचा पाया असाच मजबूत असावा लागतो. पण तेवढ्यावरच भागत नाही. व्यवहारात गुंतागुंतीच्या अनेकानेक बाबी पुढे येत असतात. समाजव्यवहारांवर त्यांचा परिणाम होणे स्वाभाविक व अपरिहार्य ठरत जाते. समाजव्यवस्थेचा पाया मजबूत असला तर असे परिणाम समाजव्यवस्थेत जिरतात, मुरतात. पण दरवेळी असे घडतेच असे नाही. पक्क्या बांधकामाने उभ्या राहिलेल्या इमारतीचा पाया पुन्हा तपासून पाहता येत नाही. पण समाजव्यवस्थेत मात्र तशी सोय आहे. किंबहुना, मूलगामी बदलांना सामावून घेणारी लवचीक समाजव्यवस्थाच काळाच्या ओघात आपले अस्तित्व टिकवून धरत असते. देशोदेशींच्या समाजव्यवस्थेचे/व्यवहारांचे नियम ठरविणाऱ्या राजकीय, प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक संस्था या कामी महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यांना देशाच्या घटनेचे, कायद्याचे, संस्कृतीचे पाठबळ असते. असे असले तरी समाजव्यवस्थेवर व समाजांतर्गत मानवी व्यवहारांवर खोलवर परिणाम करणाऱ्या काही गुंतागुंतीच्या घटना घडतच जातात. त्या लक्षात घेऊन या सर्व यंत्रणांना/संस्थांना आपला मूल्यांचा/नियमांचा पाया पुनःपुन्हा तपासावा लागतो, वेळप्रसंगी त्यात बदल करावा लागतो. असे बदल करताना सर्वंकष विचार होणे अत्यावश्यक ठरते. हा निर्णय घेणारे संबंधित तज्ज्ञ तत्कालीन परिस्थितीनुसार असा सर्वंकष विचार करतही असतात. बदलांमुळे काही आव्हाने उभी ठाकण्याचीही शक्यता असतेच. पण म्हणून असा बदल करताच कामा नये असे म्हणणे योग्य ठरत नाही. तर, अशा बदलांना सामोरे जाण्यासाठी समाजमन तयार करणे हेच उचित ठरते. मलेशिया, जपान अशा आशियाई देशांत तसेच युरोपीय देशांतही विविध क्षेत्रांतील बदलांसंदर्भात असेच काही अलीकडे घडते आहे. दक्षिण आशियातील देशांमध्ये मलेशियाने एक वेगळे स्थान मिळविले आहे. मलय, चिनी आणि

भारतीय संस्कृती एकाच देशात नांदणाऱ्या या देशाच्या स्वातंत्र्याला या महिन्यात ५० वर्षे पूर्ण होत आहेत. स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात तेथे वांशिक सलोख्याचे आव्हान उभे ठाकले आहे. 'भूमिपुत्र की स्थलांतरित' या तेथील मूळ विषयाकडे हा देश वळतो आहे. तर दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अणुबाँबच्या भीषण परिणामांना सामोरे जावे लागलेला व त्यामुळे शांतताप्रधान घटना स्वीकारलेला जपान, बदललेल्या आजच्या जागतिक परिस्थितीत शांततेचे मूल्य केंद्रवर्ती असलेल्या आपल्या राज्यघटनेची प्रस्तुतता पुन्हा तपासून पाहात आहे. बदलती जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन घटनेत बदल करायचा की नाही हा प्रश्न तेथे चर्चिला जातो आहे. तर दुसरीकडे, युरोपीय देशांमध्ये कृषिक्षेत्राशी संबंधित नियमांत बदल करण्याची चर्चा मूळ धरते आहे. कीटकनाशकांमुळे मानवी आरोग्यावर दुष्परिणाम होतात, ही वस्तुस्थिती ध्यानात घेऊन कीटकनाशकांच्या उत्पादनातील हानीकारक घटक हद्दपार व्हावेत यासाठी संबंधित कायद्यात बदल करण्याबाबत ही चर्चा आहे. अलीकडेच उद्भवलेल्या चलनवाढीचा सामना करण्याचे आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आजमितीस उभे ठाकले आहे. या चलनवाढीस चालना देणाऱ्या कारणांचा पायाभूत शोध घेऊन त्यांबाबत तितकीच पायाशुद्ध उपाययोजना करण्याची निकड आता मुखर होऊ लागली आहे. अवतीभवती दिसणाऱ्या घटना-प्रसंगांचे मूलगामी शोधन-विश्लेषण करण्याची निकड अधोरेखित करणारे विचारखाद्य 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## निवेदन

• ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

• लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# मलेशियापुढे आव्हान वांशिक सलोख्याचे

वांशिक भिन्नता रुजलेल्या, आग्नेय आशियाच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळविलेल्या आणि भौगोलिकदृष्ट्या भारताला जवळ असलेल्या मलेशियाच्या स्वातंत्र्याला ३१ ऑगस्ट २००८ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. २ कोटी ७४ लाख ९६ हजार (२००८ची अंदाजित आकडेवारी) एवढी लोकसंख्या असलेल्या या देशात स्थानिक मलय नागरिकांबरोबर चीनवंशीय आणि भारतवंशीय नागरिक मोठ्या संख्येने राहात आहेत. काही मलय नागरिक अरबवंशीय आहेत. इस्लाम हा प्रमुख धर्म असलेल्या मलेशियातील नागरिकांचा हिंदू, बौद्ध, आणि ख्रिस्ती या धर्मांच्या नागरिकांशी इतिहासकाळात परिचय झाला होता. मात्र, मलयेतर नागरिकांच्या - हिंदू नागरिकांच्या - संदर्भातील, मलेशियातील सरकारच्या धोरणांवरून अलीकडे तेथे बराच वादंग निर्माण झाला होता.

शतकांपूर्वी हा देश तामिळ प्रांतातील चोळ राजघराण्याच्या अंमलाखाली होता. साधारणपणे १४व्या शतकात तेथे व्यापाराच्या माध्यमातून इस्लामचा प्रसार झाला (काही अभ्यासकांच्या मते तेथील एका राजाने इस्लामचा स्वीकार केला होता) असे म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार करता कथील (टिन), रबर आणि पाम तेल यांच्या उत्पादनांत एकेकाळी मलेशियाने आघाडी मिळवली होती. काही काळ तेथे डचांचे वर्चस्व होते. इंग्रजांकडून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिली रम्य पहाट मलेशियाने ३१ ऑगस्ट १९५७रोजी अनुभवली तेव्हा ते 'फेडरेशन ऑफ मलेशिया' होते. मलेशिया हे अधिकृत नाव १९६३पासून व्यवहारात रूढ झाले. मलय ही तेथील राष्ट्रभाषा असून तिची लिपी अरबी लिपीआधारित असलेली 'जावी' ही आहे. पण रोमनलिपीचा वापरही तेथे मोठ्या प्रमाणावर होतो. *"Bersekutu Bertambah Mutu"* म्हणजे Unity is Strength, हे या देशाचे बोधवाक्य आहे. 'मध्यममार्गीय मुस्लिम देश' अशी ओळख असणाऱ्या मलेशियाची आजची स्थिती समजून घेणे उद्बोधक आहे.

मलेशियाचे विद्यमान पंतप्रधान अब्दुल्ला अहमद बडावी हे देशाचे पाचवे पंतप्रधान असून ते मलयवंशीय आहेत. २००३मध्ये त्यांनी पदाची सूत्रे हाती घेतली. त्यापूर्वी महाथीर मोहम्मद हे २२ वर्षे या पदावर होते. वांशिक प्रश्न, आर्थिक क्षेत्रातील कामगिरी आणि राजकीयदृष्ट्या वैचारिक खुलेपणा अशी तीन मोठी आव्हाने चालू

दशकात मलेशियासमोर उभी ठाकली आहेत. बडावी यांच्या आजवरच्या कारकिर्दीचा विचार करता त्यांनी या संदर्भात सुरुवातीच्या काळात काही धाडसी पावले उचलली, मात्र गेल्या वर्षभरात त्यांची कामगिरी चमकदार राहिलेली नाही, असे विरोधकांना व अभ्यासकांना वाटते. अलीकडे तेथे वांशिक तणाव वाढला आहे, समाज आर्थिक विषमतेने ग्रस्त झाला आहे आणि राजकीय मतभेद व ताणतणावांचा आलेखही चढताच राहिला आहे.

## वांशिक गुंता

गेल्या ५० वर्षांच्या इतिहासात तेथील वांशिक प्रश्न सतत काही ना काही कारणाने चर्चेत राहिला आहे. ब्रिटिश राजवटीपासून मलेशिया स्वतंत्र झाल्यानंतर चीनवंशीय व भारतवंशीय याच्या अधिकारांबाबतची चर्चा झाली. त्यानंतर, १९६३ मध्ये तेव्हाचा बोर्निओ हा प्रांत (आताचा पूर्व मलेशिया) मलेशियात विलीन झाला तेव्हा 'स्थानिक मलय नागरिकांचे अधिकार', हा प्रश्न महत्त्वाचा ठरला. मलय नागरिक (मूळचे इंडोनेशियाचे) हे मलेशियाचे भूमिपुत्र. आपल्याच भूमीत आपण दुर्लक्षित राहिलो आहोत, ही भावना मलय नागरिकांच्या मनात घर करून होती. कारण, मलेशियाच्या अर्थव्यवस्थेची दोरी चीनवंशियांच्या हाती होती. पण 'भूमिपुत्र' असल्याने आपल्याला विशेष महत्त्व मिळावे, असे मलय नागरिकांना वाटत होते. १९७०च्या दशकात हे नागरिक सक्रिय बनले आणि मग मलय नागरिकांचे राजकारणातील महत्त्व वाढले. आता, अलीकडच्या काळात 'मलयेतर नागरिकांचे अधिकार' हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आहे.

१९५०च्या दशकात मलयेतर नागरिकांचा प्रश्न हा प्रामुख्याने नागरिकत्वाभोवती फिरत होता. त्या काळी त्यांना नागरिकत्व देण्यात आले. १९६०च्या दशकात मलयेतर नागरिकांची भाषा व शिक्षणविषयक अधिकार यांविषयी चर्चा झाली. स्वभाषा व्यवहारात वापरण्याचा व स्वभाषेतून शिक्षण घेण्याचा त्यांचा अधिकार मंजूर करण्यात आला. १९६९ मध्ये मलय आणि मलयेतर नागरिक यांच्यात राजकीय कारणांवरून दंगल झाली.मलेशियाचे राजकारण या टप्प्यावर असताना तेथील धोरणांत 'ॲफर्मेटिव्ह ॲक्शन'चा मुद्दा प्रवेशला. त्याला 'नवे आर्थिक धोरण' असे संबोधण्यात आले. या धोरणांतर्गत मलय नागरिकांना शिक्षण व रोजगारविषयक अधिक संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. शिक्षणात इंग्रजीऐवजी मलय भाषेचा वापर वाढविण्यात आला. त्यानंतर मलय नागरिकांचे राजकीय अधिकारक्षेत्र विस्तारले.

देशांतर्गत सामाजिक स्थैर्य कायम राखण्यासाठी वांशिक व संवेदनशील मुद्यांवर चर्चा न करण्याचे धोरण सरकारने राबविले. विद्यापीठांच्या प्रांगणातून, राजकीय पक्षांमधून आणि एकंदरच समाजजीवनातून हा विषय जणू हद्दपारच झाला. मलय आणि मलयेतर नागरिक यांच्या अधिकारांभोवती फिरत असलेला हा प्रश्न सर्वंकष चर्चेअभावी विशिष्ट वर्तुळात मर्यादितच राहिला. मात्र, सरकारच्या या 'नव्या आर्थिक धोरणामुळे' समाजजीवनात बरेच बदल घडून आले. शिक्षण व नोकऱ्यांच्या अधिक संधी मिळाल्याने मध्यमवर्गीय मलय नागरिक हा गट उदयास आला. आर्थिक स्थिती सुधारल्याने हा गट राजकीय व आर्थिक धोरणांच्या संदर्भात महत्त्वाचा ठरू लागला. मलय उद्योजकांना सरकारी कंत्राटे, कामे मिळू लागली. मलय नागरिकांचा एक छोटा गट तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही आढळू लागला. देशाच्या अर्थव्यवस्थेतील मलय नागरिकांचा सहभाग हळूहळू दिसून येऊ लागला पण तो नेमका किती वाढला याबाबत मात्र अभ्यासकांमध्ये एकमत आढळत नाही. १९७०नंतरच्या काळात, मलय नागरिकांच्या संदर्भात अशा काही सुधारणा घडून येत असतानाच मलय नागरिकांमधील विषमताही वाढली.

मलय व मलयेतर नागरिक यांच्यात असुरक्षेची भावना निर्माण होऊ नये यासाठी १९९०च्या दशकात तत्कालीन पंतप्रधान महाथीर मोहम्मद यांनी काही प्रयत्न केले. यामुळे त्यांच्यावर टीकाही झाली. पण मलय नागरिकांना देशाच्या राजकारणात स्थान मिळाले. तसेच मलयेतर नागरिकही सरकारपासून दुरावले नाहीत. कारण, 'व्हिजन २०/२०' या योजनेद्वारे चीनवंशीय व भारतवंशीय नागरिकांच्या अधिकाराची व्याप्ती वाढविण्यात आली. मलय व मलयेतर नागरिकांमध्ये वांशिक तेढ निर्माण न होता सलोखा निर्माण व्हावा यासाठी महाथीर मोहम्मद प्रयत्नशील होते. तरीदेखील तेथील समाजात एक अस्वस्थता कायम होती. कारण, तेथे अशा संवेदनशील विषयांवर खुली चर्चा वा मतप्रदर्शन मान्य नव्हते. त्यामुळे नागरिकांच्या मनाच्या एका कोपऱ्यात असुरक्षेची भावना घर करून होती. त्याची कारणे १९६९मधील दंगलीनंतरच्या परिस्थितीत आढळतात. मलय व मलयेतर नागरिक यांच्यातील संबंधांबाबत खुल्या चर्चेला वाव न मिळाल्याने मलेशियातील नागरिक धर्माकडे वळले असावेत, तसेच यात मलय नागरिक अधिक प्रमाणात असावेत, असे काही अभ्यासकांना वाटते. त्यामुळे वांशिकतेच्या मुद्याला धरून मलेशियात इस्लामचे पुनरुज्जीवन झाल्याचे म्हटले जाते. याच काळात सरकारची आर्थिक मदत घेऊन शिक्षणासाठी परदेशात गेलेले विद्यार्थी या सर्व घडामोडींमुळे मानसिकदृष्ट्या मायदेशापासून अधिक दूर गेले.

## इस्लामची भूमिका

मलेशियाच्या राजकारणात इस्लामची भूमिका नेहमीच महत्त्वाची राहिली आहे. मलय नागरिकांचा 'युनायटेड मलय नॅशनल काँग्रेस' पक्ष (UMNO) आणि १४पक्ष एकत्र येऊन बनलेला 'बारिसान नॅशनल' (Barisan National) हे दोन पक्ष मलेशियाच्या राजकारणात प्रभावी ठरलेले दिसतात. 'इस्लामिक पार्टी ऑफ मलेशिया'देखील (PAS) राजकारणात आहे. 'युनायटेड मलय नॅशनल काँग्रेस' आणि 'इस्लामिक पार्टी ऑफ मलेशिया' या दोन पक्षांमध्ये राजकारणातील इस्लामची भूमिका यावर बऱ्याच चर्चा झडल्या. नागरिकांची मते इतर व्यासपीठांवरून मांडली जाण्यास अवसरच नसल्याने राजकीय पक्षांच्या माध्यमातून ती पुढे आली. याच काळात मलेशियात शहरीकरण मोठ्या प्रमाणावर घडून आले. सरकारचे भाषाविषयक धोरण आणि काही प्रमाणात जीवनशैलीतील भेद कमी झाल्याने मलय व मलयेतर नागरिक यांच्यातील दरी कमी होऊ लागली. त्यामुळेदेखील राजकीय पक्षांद्वारे नागरिकांची मते जोरकसपणे पुढे आली असावीत, असे दिसते.

मलय नागरिकांना अधिक अधिकार मिळण्यासाठी महाथीर मोहम्मद यांनी समाजजीवनातील व राजकारणातील इस्लामचा प्रभाव जाणीवपूर्वक वाढविला. त्यांच्या काळात सत्तेचे केंद्रीकरण झाल्याची टीका झाली, तेव्हादेखील मतभेदांना अटकाव करण्यासाठी त्यांना या धोरणाचा उपयोग झाला, असे राजकीय विश्लेषकांना वाटते. 'युनायटेड मलय नॅशनल काँग्रेस' आणि 'इस्लामिक पार्टी ऑफ मलेशिया' या दोन पक्षांमधील दरी बरीच कमी झाली होती. पंतप्रधानपद सोडण्यापूर्वी महाथीर यांनी मलेशिया हा इस्लामिक देश असल्याचे जाहीरही केले ('इस्लामिक पार्टी ऑफ मलेशिया'ची ही फार जुनी मागणी होती). त्यामुळे अब्दुल्ला बडावी यांनी पंतप्रधानपदाचा कार्यभार हाती घेतला तेव्हा मलेशियाच्या राजकारणाची वाटचाल इस्लामच्या दिशेने चालू झालेली होतीच. मलेशिया इस्लामिक राष्ट्र बनल्याने मलयेतर नागरिक मात्र अडचणीत आले. मलेशिया हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असून घटनेनुसार धार्मिक स्वातंत्र्य मिळेल, असे त्यांना वाटत होते. सुरुवातीच्या काळात अब्दुल्ला बडावी यांनी मलयेतर नागरिकांना फार निराश केले नाही. म्हणजे, मलेशिया हे 'मध्यममार्गी इस्लामिक राष्ट्र' असेल असा दृष्टिकोण त्यांनी स्वीकारला. तसेच आपली ही भूमिका सर्वांपर्यंत पोहचावी याची काळजीही त्यांनी घेतली, 'इस्लाम हदारी' (म्हणजे 'सिव्हिलायझिंग इस्लाम' असे साधारणपणे म्हणण्यात आले आहे) ही संकल्पना त्यांनी मांडली.

सामाजिक न्याय, इतर धर्मियांप्रती सहिष्णुता आणि आर्थिक विकास या त्रिसूत्रीचा अवलंब 'इस्लाम हदारी'मध्ये अपेक्षित आहे. समाजातील पुराणमतवाद मलेशियात वाढत असल्याकारणाने 'इस्लाम हदारी'ची पुरेशी स्पष्टता होऊन ती संकल्पना समाजात रुजली आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही. मलेशिया मध्यममार्गी इस्लामिक राष्ट्र असून तो आधुनिकतेची कास धरेल व इतर मुस्लिम देशांसाठी 'रोल मॉडेल' ठरेल, असे अब्दुल्ला बडावी सत्तारूढ झाल्यानंतर म्हटले जात होते. मात्र, ११ सप्टेंबरच्या घटनेनंतर इस्लाममधील मूलतत्त्ववादाबाबत चर्चा झडत असताना या संकल्पनेमुळे काही वेगळे घडून आलेले दिसले नाही, असे मत अभ्यासकांनी मांडले आहे. याशिवाय मलेशियाच्या आर्थिक धोरणांतही 'इस्लामचा प्रसार-प्रचार' हे एक ध्येय ठेवण्यात आले आहे. आर्थिक धोरणात असे 'धार्मिक ध्येय' प्रथमच निश्चित करण्यात आले असून ते 'इस्लाम हदारी'च्या संकल्पनेत कसे बसते, असा प्रश्न उपस्थित होतो, पण त्याचे उत्तर सध्या तरी मिळत नाही.

राजकारणातील इस्लामची भूमिका हा तेथे वादग्रस्त विषय बनला असून समाजजीवनातही त्याचा शिरकाव झाला आहे. धर्माप्रती आपले कर्तव्य व जबाबदारी मानून तेथील नागरिकही इस्लामच्या बाजूने कल दर्शवीत आहेत. नवविचार स्वीकारणे, धर्मत्याग, महिलांचे हक्क इत्यादी बाबींवरून इस्लामधर्मियांतर्गत एक सांस्कृतिक संघर्ष मलेशियात आकारत आहे. पुराणमतवादी, मध्यममार्गी आणि या दोन्ही गटांत न बसणारे नागरिक असे सर्वचजण आपापल्या श्रद्धांनुसार आपल्या अधिकारांचे रक्षण कसे करता येईल आणि अधिक अर्थपूर्ण आयुष्य कसे जगता येईल, याचा शोध घेत आहेत. वांशिक भिन्नता असलेल्या या समाजात इस्लामची चर्चा केंद्रस्थानी असून 'मलय' व 'मलयेतर' नागरिक असे ध्रुवीकरण घडून येत आहे. आपल्याला डावलले जात आहे वा सामावून घेतले जात नाही, असे काही मलयेतर नागरिकांना वाटते. तर दुसऱ्या बाजूने, इस्लामची नक्की भूमिका कोणती व काय असावी याची चर्चा इस्लामिक गटांमध्ये होताना दिसते, महाथीर मोहम्मद पंतप्रधान असताना त्यांनी मलेशियाची वाटचाल इस्लामच्या दिशेने होण्यासाठी प्रयत्न केले. पण अब्दुल्ला बडावी सत्तारूढ झाल्यानंतर त्यांनी 'इस्लामिक राष्ट्र' म्हणजे नेमके काय, याची स्पष्टता व्हावी यासाठी 'इस्लाम हदारी'ची चौकट आखली. पण या संदर्भात पुरेशी स्पष्टता न झाल्याने इस्लामची भूमिका हा चर्चेचाच विषय बनून राहिला आहे. वांशिक स्थैर्य आणि धर्माची भूमिका ही आव्हाने सरकारपुढे आहेत.

## आश्रयदाते सरकार

मलेशियातील प्रश्न केवळ धर्माभोवतीच फिरतो आहे, असे नाही. या सर्व घडामोडीत अर्थकारण हाही एक महत्त्वाचा मुद्दा राहिलेला आहे. 'नव्या आर्थिक धोरणा' मुळे सरकार आणि मलय नागरिक यांच्यातील संबंधांना बळकटी आली. बडावी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी या धोरणाचा उपयोग आपल्या पक्षहितासाठी करून घेतला. तसेच मलय नागरिकांना झुकते माप दिले. सरकारच आश्रयदाते असल्याने मलय नागरिकांच्या लघुउद्योगांना चांगले दिवस आले असून बरीच कंत्राटे त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात आली आहेत, असे अभ्यासक म्हणतात.

मलेशियात स्वातंत्र्यानंतरच्या काळात अर्थउद्योगात चिनी नागरिकांचा वरचष्मा होता, ते चित्र पालटून मलय नागरिक त्यांची जागा घेतील अशी सरकारची धोरणे असल्याचे दिसते. जुन्या आर्थिक धोरणांमुळे विषमता व समाजगटांमधील मतभेद वाढीस लागले होते व त्या वेळेस समाजगटांमध्ये जशी नाराजीची स्थिती निर्माण झाली होती त्याप्रमाणे अलीकडची स्थिती असल्याचे मत त्यामुळे व्यक्त करण्यात येते. मलयेतर नागरिकांना आता मलेशियात असुरक्षित वाटू लागले आहे आणि सरकारवरील त्यांचा विश्वास संपुष्टात येऊ लागला आहे, याचे बोलके उदाहरण म्हणजे मलेशियातून इतर देशांमध्ये स्थलांतर (emigration) करणाऱ्या नागरिकांच्या संख्येत गेल्या वर्ष-दोन वर्षांत सहापट वाढ झालेली दिसते.

## आर्थिक विकासाच्या मार्गावर

सामाजिक स्थैर्यासाठी वांशिक सलोखा कायम राखला पाहिजे याची जाणीव अब्दुल्ला बडावी यांच्या सरकारला आहे. पण तसे घडेल की नाही याबाबत साशंकता आहे. सरकारने आर्थिक विकासाच्या मार्गावर योग्य पावले टाकली तर कदाचित असे घडू शकेल, असा काहींचा अंदाज आहे. स्वातंत्र्योत्तर काळात रबर, कथील (टिन) आणि पाम तेलाच्या निर्यातीमुळे मलेशियाने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळविले होते. आयातीचे प्रमाण बेताचेच होते. देशांतर्गत औद्योगिकरणाची गती संथ होती. १९७०च्या दशकात मात्र सरकारच्या आयातनिर्यातविषयक धोरणांत मूलगामी बदल घडून आले, ते निर्यातभिमुख बनले. आर्थिक विकासासाठी देशांतर्गत भांडवल पुरेसे ठरणार नाही असे सरकारच्या लक्षात आले आणि तेव्हा देशांतर्गत भांडवल प्रामुख्याने चीनवंशीयांच्या हातात होते. त्यामुळे परकीय भांडवलाचा ओघ मलेशियाकडे वळावा यासाठी सरकारने आपले धोरण बदलले.

१९६९मधील संघर्ष वगळता मलेशियात राजकीय स्थैर्य होते आणि 'इस्लामिक देश' अशी त्याची ओळख नव्हती. त्यामुळे सरकारचे धोरण बदलल्यानंतर १९७०च्या दशकात परकीय भांडवल आकर्षित करण्यासाठी कर आणि गुंतवणूकविषयक सोयीसवलती जाहीर करण्यात आल्या. १९८०च्या दशकात अमेरिका, जपान आणि तैवान येथून मलेशियाकडे भांडवलाचा ओघ वाढला. मग, हळूहळू औद्योगिक क्षेत्राचा विकास होऊ लागला.त्या वेळी प्रामुख्याने इलेक्ट्रॉनिक्स उद्योग फोफावला. नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध झाल्या. दरम्यान, तेल व वायू या नैसर्गिक संसाधनांवर सरकारचे नियंत्रण होतेच. तंत्रज्ञान व तंत्रज्ञ यांच्यामुळे हे उत्पादनही वाढले. एकंदरीत अर्थ-उद्योगात बरे दिवस आले असताना १९९७मध्ये आशियातील आर्थिक संकट उद्भवले.

या आर्थिक संकटातून मलेशियाला सुखरूप बाहेर पडता आले, पण तत्कालीन पंतप्रधान महाथीर मोहम्मद यांचे सहाय्यक असलेल्या अन्वर इब्राहिम या नेत्याच्या कार्यपद्धतीमुळे तेथील राजकारणात काही बदल घडून आले. अन्वर इब्राहिम यांनी आपली वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या उपाययोजनांचे समर्थन करणारी भूमिका स्वीकारली असे म्हटले गेले. आर्थिक संकटाच्या या काळात (बहुधा सरकारची धोरणे न पटल्याने ?) १९९९च्या निवडणुकीत मलय नागरिकांचा पाठिंबा महाथीर सरकारला मिळाला नाही. त्यानंतर महाथीर मोहम्मद यांच्या सरकारने मलय नागरिकांचा पाठिंबा मिळविण्यासाठी काही धोरणे आखली. त्यांची अंमलबजावणी करताना मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला. अब्दुल्ला बडावी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी ही धोरणे बदलली. भ्रष्टाचार हटविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. भ्रष्टाचारी नेत्यांवर कारवाई केली. सरकारी खर्चात कपात केली. त्यांच्या कडक धोरणामुळे नागरिकांचा पाठिंबा त्यांना मिळाला.

अलीकडे मात्र बडावी यांची धोरणे पुन्हा बदलत आहेत. यामागे दोन कारणे आहेत. एक म्हणजे, त्यांना पक्षांतर्गत विरोध होतो आहे. राजकारणात प्रवेश केल्याने मिळणाऱ्या लाभाचा विचार करूनच त्यांच्या पक्षात अनेक नेते व सदस्य यांचा भरणा झालेला आहे. पक्षात टिकून राहायचे असेल तर बडावींना या नेत्यांशी जुळवून घ्यावे लागणार आहे. दुसरे अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे, आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडींमुळे भविष्यात मलेशियाला परकीय गुंतवणुकीवर जास्त प्रमाणात अवलंबून राहता येणे शक्य होणार नाही. कारण, परकीय गुंतवणूकदारांना चीनने आकर्षित केले आहे. त्यामुळे, मलेशियातील परकीय गुंतवणुकीचा ओघ चीनकडे वळू लागला आहे.

शिवाय, इंडोनेशियातील अस्थैर्य आणि वाढता इस्लामिक दहशतवाद यांमुळे गुंतवणुकदारांचा मलेशियाकडील ओढा कमी झाला. व्यापार-उद्योगात मलय नागरिकांना सरकार झुकते माप देत असले तरी परदेशांतील गुंतवणूकदारांच्या मते सरकारवर अवलंबून असल्याने मलय नागरिक स्पर्धेत मागे पडतात. त्यामुळेदेखील परकीय गुंतवणूक कमी होऊ लागल्याचे म्हटले जाते. अशा परिस्थितीत बडावी यांनी पुन्हा मलयेतर नागरिकांची (प्रामुख्याने चीनवंशीय) देशांतर्गत होणारी गुंतवणूक आणि चीनबरोबरचे व्यापारी संबंध यांना महत्त्व देण्याचे ठरविले आहे. या पार्श्वभूमीवर, सरकारची आर्थिक धोरणे कसकशी वळणे घेतील, याचा विचार अभ्यासक करीत आहेत.

## बंदिस्त चर्चा

मलेशियातील राजकीय व आर्थिक चर्चा या साधारणपणे ठरावीक वर्तुळातच घडून आलेल्या आहेत. महाथीर यांची कारकीर्दही याला अपवाद नव्हती. बडावी पंतप्रधान झाल्यानंतर मात्र त्यांनी सुरुवातीच्या काळात राजकीय खुलेपणा मान्य केला. १९७०च्या दशकात तेथे काही नागरी संघटना उभ्या राहिल्या होत्या. त्यांना चर्चांमध्ये सहभागी करून घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. विविध समाजगटांना राजकीय पातळीवर मान्यता मिळणे ही मलेशियात एक उल्लेखनीय बाब ठरली. कारण, महाथीर पंतप्रधान असतानाही अशा खुल्या चर्चा झालेल्या नव्हत्या. त्यामुळे नागरिकांनी बडावी यांच्या प्रयत्नांचे स्वागत केले. पण या संदर्भात, गेल्या वर्षभरात बडावी पुन्हा जुन्याच मार्गाकडे जात आहेत, असे दिसते. मलयेतर नागरिकांच्या चर्चांवर पुन्हा बंधने आली आहेत. त्यातच मलेशियात संपूर्ण लोकशाही नाही. निवडणुका होऊन तेथे विरोधी पक्षांचे सदस्य निवडून येत असले तरी निवडणूक प्रक्रिया सरकारच्याच हाती असते. मतदारसंघांची रचना करताना सत्तारूढ पक्षाची सोय बघितली जाते. तेथील माध्यमांवर सरकारचा दबाव आहे.

समाज अस्थिर होऊ नये यासाठी तेथील विचारवंतही खुल्या चर्चा करणे टाळतात. महाथीर यांचे एकेकाळचे सहकारी अन्वर इब्राहिम यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांनी राजकीय चर्चाविषयक बंदिस्त धोरण मागे घेण्याची मागणी केली आहे. बडावी यांच्यासाठी हे एक मोठे आव्हान ठरते आहे. गेल्या ५० वर्षांत मलेशियाची जडणघडण अशी झालेली असताना वांशिक सलोखा कायम ठेवून आणि मलय व मलयेतर नागरिकांना विकासप्रक्रियेत सहभागी करून घेऊन देशाचा विकास अब्दुल्ला बडावी कसा घडवून आणतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरावे. ✿✿

# ‘शांततेच्या घटना’त्मक पेचात जपान

नाविन्याचा शोध, परिश्रम, सातत्य, चिकाटी, अचूकतेचा ध्यास, सतत सुधारणा आणि उत्कृष्ट व्यवस्थापन अशा गुणांमुळे जगातील औद्योगिक क्षेत्रात मानाचे स्थान मिळविणाऱ्या जपानचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे हा देश शांततेशी नाते जोडणारा आहे. अणुबॉंबच्या भीषण नरसंहाराने (६ व ९ ऑगस्ट १९४५) हादरलेल्या जपानने युद्धापासून कायमस्वरूपी फारकत घेऊन शांततेशी मैत्री केली ती आजपर्यंत! या मैत्रीला जपानने आपल्या घटनेच्या धाग्यात गुंफून एक वेगळे परिमाणही दिले. जपानच्या संसदेने (Diet) मान्यता दिल्यानंतर ३ मे १९४७ पासून अंमलात आणलेल्या घटनेच्या नवव्या कलमात म्हणण्यात आले आहे -

> *“न्याय आणि सुव्यवस्था यांवर आधारित आंतरराष्ट्रीय शांततेची मनःपूर्वक कामना करणारे जपानचे नागरिक, युद्ध करण्याच्या राष्ट्राच्या सार्वभौम हक्काचा आणि आंतरराष्ट्रीय वाद सोडविण्यासाठी बळाचा वापर करण्याच्या वा धमकी देण्याच्या मार्गाचा त्याग करीत आहेत.... (ही) ध्येयपूर्ती व्हावी यासाठी जमीन, समुद्र अथवा हवाई मार्गाने लढण्यासाठी साधनसामग्री जमवून तिची देखरेख करण्यात येणार नाही. राष्ट्राचा युद्धप्रियतेचा हक्क मान्य करण्यात येणार नाही.”*

युद्धविचाराने ग्रासलेल्या जगाला, आपल्या कृतीतून शांततेच्या मार्गाची आदर्श दिशा दाखविणाऱ्या जपानमध्ये या कलमावरून अलीकडे घटनात्मक पेच निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील बदलती राजकीय परिस्थिती घेता युद्धात सहभागी होणाऱ्या इतर राष्ट्रांना जपानने मदत करायची किंवा नाही, मदत करायची ठरविल्यास ती कोणत्या प्रकारे करायची, असे प्रश्न उपस्थित झाले. तेव्हा जपानमधील विरोधी पक्षांनी जपानाने अशी कृती करणे म्हणजे जपानच्या घटनेचा भंग ठरेल, असे म्हटले होते. जगभरात आदर्श ठरलेले आणि शांततेचा पुरस्कार करणारे जपानच्या घटनेतील कलम बदलायचे का, असा हा पेच आहे. विशेषतः, अफगाणिस्तान आणि इराक येथील राजकीय अस्थैर्याच्या काळात या भूमिकेवरून वाद निर्माण झाला होता.

यानंतर, आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशतवादाचा मुकाबला करण्यासंदर्भात जपानला इतर राष्ट्रांना मदत करता येत नाही, म्हणून २००१मध्ये जपानच्या सरकारने संसदेसमोर दहशतवादविरोधी उपाययोजना करण्याबाबत एक विशेष विधेयक मांडले होते. ते मंजूर झाल्यानंतर नवीन कायद्यानुसार जपानने अमेरिका आणि ब्रिटनच्या युद्धनौकांना इंधन व पाणी पुरविले होते. एखाद्या देशाने जपानवर आक्रमण केल्यास उद्‌भवलेल्या परिस्थितीस जपानने कसे सामोरे जावे यासाठी २००३च्या जून महिन्यात जपानच्या संसदेने काही कायदे केले. त्यानंतर ऑक्टोबर २००५मध्ये सत्तारूढ 'लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी'ने घटनेतील नववे कलम नव्याने लिहिण्यात यावे आणि त्या नव्या कलमानुसार जपानला स्वसंरक्षणार्थ लष्कर ठेवता यावे, यासाठी एक आराखडा तयार केला. मग घटनात्मक दुरुस्ती करण्यासाठीची प्रक्रिया म्हणून संसदेने 'राष्ट्रीय सार्वमत कायदा' (नॅशनल रेफरेन्डम लॉ) मांडला. आता, इतर राष्ट्रांना मदत करण्यासाठी स्वसंरक्षण गटाच्या सदस्यांना परदेशांत पाठविणे हे घटनेनुसार उचित आहे किंवा कसे या प्रश्नाभोवती सध्या चर्चा केंद्रित झाली आहे. या पार्श्वभूमीवर जपानमधील सरकारी वर्तुळात आणि सत्तारूढ 'लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी'मध्ये नववे कलम नव्याने लिहिण्याबाबतची चर्चा व उत्साह वाढला आहे. यासाठी मे २००७मध्ये 'राष्ट्रीय सार्वमत कायदा' लागू करण्यात आला आहे.

जपानमधील शांततावादी अभ्यासकांनी या संदर्भात काही मते मांडली आहेत. शांतता व सहकार्याचे धोरण अंमलांत आणण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्नशील असणाऱ्या Rissho Kosei-kai या बौद्धधर्मीय संस्थेच्या परराष्ट्र विभागाचे संचालक ताकेशी कावाबाता म्हणतात, ''दहशतवादी कारवाया या निंदनीय आहेत हे नि:संशय. शिवाय अनेक देशांमध्ये राजकीय अस्थिरता आहे, युद्धखोरी वाढताना दिसते आहे हेही खरे आहे. पण शांतता प्रस्थापित करण्यासाठी बळाचा उपयोग करण्याशिवाय दुसरा मार्ग नाही का ? शांततेसाठी युद्ध करण्याचा काळ मागे पडला आहे. जागतिकीकरणाच्या काळात परस्परसहकार्य आणि परस्परावलंबन यांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. गरिबी, भेदभाव, दडपशाही हे आता महत्त्वाचे प्रश्न बनले आहेत. हेच प्रश्न युद्धाला कारणभूत ठरत आहेत. म्हणून जगभरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी काही मूलभूत विषयांकडे वळण्याची गरज निर्माण झाली आहे. देशोदेशींचे आर्थिक व सामाजिक प्रश्न, ऊर्जाविषयक प्रश्न यांची तड लावणे गरजेचे ठरणार आहे. या वेळी मला जपानच्या घटनेतील उपोद्‌घात (Preamble) प्रकर्षाने आठवतो.

त्यात म्हणण्यात आले आहे की, आम्ही जपानी नागरिक शांतताप्रिय आहोत. (माणुसकी जागविणाऱ्या) व मानवी संबंधांना नियंत्रित करणाऱ्या आदर्शांबद्दल आम्ही सजग आहोत. आमची सुरक्षा आणि अस्तित्व टिकविण्यासाठी न्याय्य भूमिका घेणाऱ्या शांतताप्रिय नागरिकांवर आमचा विश्वास आहे. शांततेची जपणूक करून आंतरराष्ट्रीय पातळीवर मानाचे स्थान मिळविण्याची आमची इच्छा आहे. गुलामगिरी, दडपशाही आणि असहिष्णुता संपुष्टात येऊन सर्वांची वाटचाल शांततेच्या मार्गाने व्हावी, असे आम्हाला वाटते. असा आशय असणाऱ्या जपानच्या घटनेवरून हा देश शांततेसाठी कटिबद्ध आहे हे स्पष्ट होते. असे असताना आपण घटनेत बदल करून लष्करी बळाकडे वळण्यापेक्षा शांततेचाच प्रसार का करू नये ? उलट, आपल्या घटनेतील शांततेचे मूल्य आपण जगात सर्वत्र पोहचविले पाहिजे.''

टोकियो येथील Chuo विद्यापीठातील कायद्याचे सुप्रतिष्ठ प्राध्यापक योशिकी सानादा म्हणतात, ''घटनेतील नवव्या कलमामुळेच जपानची घटना ही 'शांततेची घटना' म्हणून ओळखली जाते. नेदरलँड्स् येथे जागतिक शांततेसंदर्भात झालेल्या परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघाचे तत्कालीन सरचिटणीस कोफी अन्नान यांनी याच नवव्या कलमाचा आदर्श इतर राष्ट्रांसमोर मांडला होता. या कलमावर देशांतर्गत व परदेशांकडून अशा दोन बाजूंनी आघात होतो आहे. कलमात बदल करण्याची देशातंर्गत भावना ही उत्तर कोरियातील घटनांशी जोडली गेली आहे. क्षेपणास्त्रांच्या मदतीने उत्तर कोरिया आक्रमक होऊ लागल्याचे दिसताच जपानमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. जपाननेही स्वसंरक्षणार्थ उपाययोजना करायला हवी, असा मतप्रवाह तेथे बळावू लागला. अशी उपाययोजना आखण्यासाठी जपानच्या घटनेत बदल करण्याची चर्चा जोर धरू लागली. तर दुसरीकडे, युद्धविषयक आंतरराष्ट्रीय घडामोडींत सहभागी न होण्यासाठी जपान आपल्या घटनेतील कलमाचा उपयोग करीत आहे, अशी टीका आंतरराष्ट्रीय पातळीवर करण्यात आली.

आखाती युद्धाच्या वेळी जपानला लष्करविषयक सहभाग न घेता आल्याने जपानने आर्थिक भार उचलून त्याची कसर भरून काढली. जपानने त्या वेळी १३ अब्ज अमेरिकी डॉलर इतका खर्च केला. पण त्या वेळी काही राष्ट्रांनी 'केवळ खर्च केल्याने सर्व काही होत नाही. आमचे सैनिक युद्धात धारातीर्थी पडतात. जपान भित्रेपणा करतो,' अशी टीकाही जपानवर केली. यानंतर आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा अभ्यास करून जपानने वेगळा दृष्टिकोण अवलंबिला. युद्धासाठी अब्जावधी डॉलर

खर्च करणाऱ्या देशांबरोबर चर्चा करून जपानने Law Concerning the Special Measures on Humanitarian and Reconstruction Assistance in Iraq कार्यान्वित केला. पण अशा मार्गाने आंतरराष्ट्रीय पातळीवरील सेवा खरोखरच घडते का, असा प्रश्न उपस्थित होतोच. २००१मध्ये जपानच्या सरकारने संसदेसमोर दहशतवादविरोधी उपाययोजना करण्याबाबत मांडलेले विशेष विधेयक प्रथम दोन वर्षांसाठी मंजूर करण्यात आले होते. नंतर त्याची मुदत तीन वेळा वाढविण्यात आली. आंतरराष्ट्रीय दबावामुळे चौथ्यांदा ते मुदतवाढीसाठी संसदेत आले तेव्हा मात्र विरोधी पक्षांनी त्यावर आक्षेप घेतला व ते मंजूर केले नाही. त्यामुळे १ नोव्हेंबर २००७ पासून त्याची अंमलबजावणी झालेली नाही. म्हणून, जपानच्या सरकारला आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणतीही कृती करता आलेली नाही. अफगाणिस्तानसारख्या देशांमधील परिस्थिती सुधारावी यासाठी युद्ध हाच पर्याय असतो, अशी जपानी नागरिकांची धारणा नाही. अफगाणिस्तानमधील नागरिकांचे जीवनमान चांगले व्हावे यासाठी मात्र प्रयत्न करण्यास जपानी नागरिक मागेपुढे पाहणार नाही. युद्ध हा जीवन संपविण्याचा मार्ग आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय सहकार्याचा विचार करता जीवन संपविण्यात सहभागी व्हायचे की जीवनपद्धती बदलण्यासाठी सहकार्य करायचे, हा जपानी नागरिकांसमोरील प्रश्न आहे आणि जपानने आपला शांततेचा मार्ग सोडू नये असे अनेकांना वाटते.

'वर्ल्ड कॉन्फरन्स ऑफ रिलिजिन्स फॉर पीस' या संस्थेशी संलग्न असलेल्या 'पीस रीसर्च इन्स्टिट्यूट'चे संचालक व टोकियो येथील Musashino विद्यापीठातील प्राध्यापक रुमयो यामाझाकी गेली ४० वर्षे शांततेशी संबंधित विविध विषयांवर लेखन करीत आहेत. त्यांच्या मते युद्धाने प्रश्न सुटत नाहीत, सुटलेले दिसत नाहीत. हिंसा ही हिंसेलाच जन्म देते. पण आजघडीला हे कोणी लक्षात घेत नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने शांततेचा पुरस्कार केल्यानेच एकही जपानी नागरिक युद्धात मृत्युमुखी पडलेला नाही. तसेच एकाही जपानी नागरिकाने युद्धभूमीवर कुणाला ठार केलेले नाही. असे असताना इतर राष्ट्रांच्या, विशेषतः अमेरिकेच्या, दडपणामुळे जपानने आपला शांततेचा मार्ग का सोडावा ? मनामनांत शांतता निर्माण करणाऱ्या बौद्ध धर्माचा अवलंब करणारे जपानी नागरिक युद्धाच्या व पर्यायाने घटनेतील नववे कलम बदलण्याच्या विरोधात असणे स्वाभाविकच आहे. कारण ते शांततेचे महत्त्व ओळखून आहेत. बौद्ध धर्माने शांततेचे महत्त्व अधोरेखित केलेले असून जपानची सध्याची घटना या धर्मतत्त्वांशी सुसंगत अशीच आहे.

लोकांना प्रिय असणारी सार्वभौमता, मूलभूत मानवाधिकार आणि शांततावाद या तीन तत्त्वांवर आधारित असलेली जपानची राज्यघटना आदर्श अशीच आहे. सैन्य नको, युद्धाची साधने नको आणि युद्धच नको अशी जपानची भूमिका लाखो नागरिकांच्या मृत्युमुळे घडलेली आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या दुःखद आठवणी आजही अनेकांना विसरता आलेल्या नाहीत. ''शांततेच्या या घटनेत बदल करायचा असेल तर युद्धात मृत्यमुखी पडलेल्या माझ्या वडिलांना परत आणा,'' असे पत्र एका मुलीने एका नियतकालिकात लिहिले आहे. या लोकभावनेचा आदर करायचा सोडून 'लिबरल डिमोक्रॅटिक पार्टी'च्या नेत्यांनी घटनेत बदल करण्याचा आराखडा तयार केला आहे. त्यानुसार स्वसंरक्षणार्थ लष्कर स्थापनेसंदर्भात चार पोटकलमे आहेत आणि जपानचे पंतप्रधान या लष्कराचे सर्वोच्च नेते आहेत. जानेवारी २००७ पासून जपानची 'संरक्षण एजन्सी' ही 'संरक्षण मंत्रालय' बनली आहे. सरकारची ही कृती हा युद्धाकडे जाण्याचा मार्ग ठरू शकतो, म्हणूनच त्याला मोठा विरोध होतो आहे. केवळ भीतीमुळेच माणसे शस्त्रे जमविण्यास व बाळगण्यास उद्युक्त होतात असे नाही, तर शस्त्रसज्ज झाल्याने मनात भीती निर्माण होते, असे बुद्धांचे प्रतिपादन आहे. ज्या देशांकडे अण्वस्त्रे नाहीत ती अस्वस्थ होऊन, भीतीने अण्वस्त्रसज्जतेकडे झुकतात आणि जे देश अण्वस्त्रसज्ज आहेत ते अण्वस्त्रसज्ज होऊ पाहणाऱ्या देशांवर मोठे दडपण आणतात, हा सध्या जगाचा नियम बनला आहे. लष्करी ताकदीमुळे राष्ट्राराष्ट्रांमधील संबंध ताणतणावाचे बनतात आणि समाजगटांमध्ये हिंसा आकारण्याची एक साखळी-प्रतिक्रियाच चालू होते. त्यामुळे शस्त्रसज्जता हा शांततेसाठीचा उपाय ठरत नाही.

जपानमधील नागरिकांप्रमाणे जागतिक शांततेच्या प्रयत्नात सहभागी असलेले परदेशांतील काही अभ्यासकही या संदर्भात आपले मत नोंदवतात. 'कोरियन कॉन्फरन्स ऑन रिलिजन अँड पीस'चे सचिव आणि उत्तर कोरियातील अभ्यासक Byun Jin-heung यांच्या मते जपानमधील घटनादुरुस्तीचा प्रश्न ईशान्य आशियातील देशांसाठी फार महत्त्वाचा आहे. आपल्या घटनेत बदल करण्याचा जपानला अधिकार आहेच. तो नाकारण्याचा प्रश्न नाहीच. पण जपानची शेजारी राष्ट्रे यामुळे चिंतित होणेही स्वाभाविक आहे. कारण जपानचे हे कलम म्हणजे इतर राष्ट्रांसाठी शांततेचा एक करारच ठरतो. जपानच्या घटनेतील बदलासंबंधी सचिंत होऊन जपान आणि दक्षिण कोरियातील नागरिकांनी एकत्र येऊन 'कलम ९ संस्था' स्थापन केली आहे. जपानने शांततेच्या तत्त्वाचा पुरस्कार केल्यानेच जपानची आर्थिक प्रगती झाली. जपानने या प्रगतीचा

उपयोग करण्याचे ठरविले तर जगात कायमच शांतता राहावी यासाठी जपानला सतत प्रयत्नशील राहता येईल, त्यामुळे जपानने शांततेचा मार्ग सोडू नये, असे जपानमधील व कोरियातील शांतताप्रिय नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान, कोरियातील प्रसारमाध्यमांनीही जपानमधील या घडामोडींकडे विशेष लक्ष दिले आहे. Seoul Shinmunने जपानमध्ये वास्तव्य करणाऱ्या व मानवाधिकाराच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या Shin Suk-ok या कोरियन वंशाच्या अभ्यासिकेचे विचार प्रसिद्ध केले आहेत. जागतिक राजकारणाचा विचार करता अमेरिका उजवीकडे झुकत असल्याने जगभरात तोच कल पसरत असल्याचे आढळते. जपानमध्येही त्याचाच प्रभाव दिसत असून घटनेत बदल करण्याचे प्रयत्न त्याचेच निदर्शक आहेत, असे म्हणता येईल. लष्करविषयक साधनसामग्री बनविणाऱ्या उद्योजकांबरोबर अमेरिकेच्या सरकारचे विशेष संबंध आहेत. अमेरिकेची अशी लष्करी ताकद पाहून जपानलाही आपला जुना काळ (१९३०मधील लष्करवाद) आठवू शकतो. या पार्श्वभूमीवर आपले हित जपण्यासाठी बाजारपेठा, साधन-सामग्री जमविणे तसेच लष्करी बळ प्राप्त करणे या दिशेने जपानमधील सरकारची पावले पडू शकतात. त्यांचे हे म्हणणे जरा अतिशयोक्तीकडे झुकत असल्याचे काहींचे मत आहे. तरी त्यांच्या मतप्रदर्शनामुळे जपानमध्ये अशी दिशा असू शकते, असाही विचार या संदर्भात होत आहे. जपान आणि कोरिया यांच्यातील संबंधांचा विचार करता जपानने शांततेचाच मार्ग स्वीकारावा असे म्हटले जात आहे. या चर्चा चालू असतानाच टोकियो विद्यापीठातील सुप्रतिष्ठ प्राध्यापक हारुकी वादा आणि कोरियातील प्राध्यापक कांग सँग-जुंग यांनी 'ईशान्य आशियाई कॉमन हाऊस'ची स्थापना करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. त्यानुसार जपान, उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया या तीन देशांना 'अण्वस्त्ररहित शांततेचे क्षेत्र' या रुपाने चीन, रशिया आणि अमेरिका या तीन देशां - संदर्भात 'बफर झोन' म्हणून कार्य करता येईल. लष्करी ताणतणाव कमी करून शांतता व सुरक्षेचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न याद्वारे करता येईल.

विसावे शतक हे हिंसेने, युद्धाने गाजले. हिंसेतून हिंसाच निपजते हे चालू शतकाच्या सुरुवातीलाच -११ सप्टेंबरच्या घटनेनंतर - दिसून आले. त्यानंतर झालेल्या इराक युद्धानेही अशांतताच निर्माण झाली. अफगाणिस्तान, पाकिस्तान येथेही अशांतताच आहे. आता इराणवर युद्धाचे ढग जमण्याची चिन्हे आहेत. अशा परिस्थितीत आपल्या 'शांततेच्या घटने'चा अभिमान बाळगणाऱ्या देशावर 'शांततेच्या कलमा'बाबत फेरविचार करण्याची वेळ यावी, हे त्या देशाचे आणि जगाचे दुर्दैव नव्हे काय ? ✿✿

# युरोपमध्ये चर्चा 'धोक्या'ची

मानवी आरोग्य हा प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा व अखंड चिंतेचा विषय आहे. विशेषतः काही विशिष्ट खाद्यपदार्थांच्या सेवनामुळे होणारी मानवी आरोग्याची हानी या मुद्याने अनेकानेक तज्ज्ञांचे लक्ष वेधले आहे. अतिउष्मांक असलेले पदार्थ व तळलेले पदार्थ खाणे, मेदयुक्त व चरबी वाढविणारे पदार्थ आहारात अधिक प्रमाणात असणे, वेळी-अवेळी खाणे याबरोबरच जीवनशैलीतील बदल, व्यायामाचा अभाव या बाबी आरोग्याचे नुकसान करतात, हे आता सर्वज्ञात आहे. यांबाबत देशोदेशीचे नागरिक आता जागरुक होऊ लागले आहेत. ही जागरुकता केवळ खाद्यपदार्थांबाबत निर्माण होते आहे, असे नाही. तर, खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी अत्यावश्यक असलेले धान्य पिकविण्याबाबत आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कीटकनाशकांच्याबाबतही ती आढळते आहे. कीटकनाशके ही आरोग्याला अपायकारक असतात आणि अशी कीटकनाशके वापरून तयार करण्यात आलेले अन्नधान्य सेवन केल्याने कीटकनाशकांमधील अपायकारक घटक मानवी शरीरात प्रवेश करतात. असे घडू नये यासाठी अलीकडेच युरोपमध्ये या संदर्भात एक नवीनच मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. कीटकनाशकांच्या वापराशी संबंधित असलेले युरोपमधील आजमितीचे कायदे हे (आरोग्याला) 'धोका' म्हणजे 'Risk' या संकल्पनेला केंद्रस्थानी धरून आखण्यात आले आहेत. त्या ऐवजी 'Hazard' ही संकल्पना आता आधारभूत मानावी, अशी चर्चा युरोपमध्ये चालू झालेली आहे. या मूलभूत बदलाचे परिणाम दूरगामी होऊ शकतात. यामुळे अनेक हानीकारक रसायने कीटकनाशकांच्या बाजारपेठेतून हद्दपार होण्याची शक्यता आहे.

Risk आणि Hazard या दोन शब्दांत नेमका काय फरक आहे इथून या चर्चेची सुरुवात होते. बरेचदा हे दोन्ही शब्द समानार्थी म्हणून वापरले जातात. पण दोहोंतील जरासा फरक समजून घेतला पाहिजे. परिचयातील काही उदाहरणांवरून हे समजून घेता येईल. Hazard म्हणजे शरीराला, आरोग्याला हानीकारक वा जमीन-जुमल्याच्यासंदर्भात धोकादायक. जसे की वायूप्रदूषण, जलप्रदूषण हे जीवसृष्टीसाठी हानीकारक असते, विद्युत यंत्रणा व्यवस्थित बसविली गेली नाही तर इमारतीसाठी ते हानीकारक ठरू शकते.

Risk म्हणजे जोखीम वा धोका. Risk हा शब्द साधारणतः आर्थिक धोक्यासंदर्भात जास्त प्रमाणात वापरला जातो. उदाहरणार्थ - एखाद्या कंपनीत पैसे गुंतवणे यात Risk असते/असू शकते. Hazard म्हणजे शारीरिक इजा निर्माण करणारे काही घटक, काही विशिष्ट रसायने, विद्युतयंत्रणेतील घटक इत्यादी. तर Risk म्हणजे हानीकारक घटकांमुळे निर्माण होणारा धोका, असाही फरक काही ठिकाणी केला जातो. एखादा उद्योग Hazardous असू शकतो म्हणजे त्यातील उत्पादन वा उत्पादनप्रक्रिया पर्यावरणाला व नागरिकांच्या आरोग्याला अपायकारक ठरू शकते. तर एखाद्या उद्योगात Risk असते म्हणजे त्यात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता अधिक असते. आणखी एक उदाहरण म्हणजे, नदीच्या खोल पात्रात पोहायला जाणे हे Risky ठरू शकते तर प्रदूषित नदीचे पाणी हे Hazardous गटात मोडेल.

कीटकनाशकांवर चालू असलेल्या युरोपमधील चर्चेसंदर्भात Hazard म्हणजे, आरोग्याला हानीकारक ठरू शकणाऱ्या घटकांची प्रयोगशाळेत तपासण्यात येणारी मात्रा होय. तर Risk म्हणजे असे हानीकारक घटक प्रत्यक्षात/व्यवहारात नेमके कसकशा प्रकारे किती वेळा उपयोगात आणले जातील ते समजून घेणे होय, असे म्हणण्यात आले आहे. युरोपमधील वनस्पती/वृक्षसंरक्षण कायद्यात आता Risk ऐवजी Hazard असा शब्द वापरण्यात यावा अशी चर्चा असून त्यासंबंधी या वर्षाअखेरीस अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. या बदलाच्या समर्थक गटाचे म्हणणे असे आहे की यामुळे युरोपमधील अनेक हानीकारक रसायने कीटकनाशकांच्या बाजारपेठेतून हद्दपार होतील. या संबंधित विभागाच्या एका अधिकाऱ्याच्या मते जे उत्पादन सुरक्षित आहे असे सिद्ध झालेले आहे तेच बाजारपेठेत उपलब्ध असावे, असे नवीन कायद्यामागील तत्त्व आहे. शेतीतज्ज्ञांचे मत जरा वेगळे आहे. ते म्हणतात, अन्नधान्याचे उत्पादन वाढावे यासाठी कीटकनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. नव्या कायद्यामुळे कीटकनाशकांचा वापर करण्यावर बंधने आली तर उत्पादन घटण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे बाजारभाव अधिकच वाढू शकतात. धान्याचे सध्याचे वाढलेले बाजारभाव पाहता ही परिस्थिती गंभीर होईल, असा मुद्दा ते मांडतात. ब्रिटनमधील अभ्यासकाच्या अंदाजानुसार अशा बदलाचा थोडा परिणाम जरी लक्षात घेतला तरी सध्याच्या उत्पादनात किमान एक चतुर्थांश इतकी घट होण्याची शक्यता आहे. इटलीतील अभ्यासातही असाच अंदाज मांडण्यात आला आहे. त्यामुळे या विषयावर सर्वंकष चर्चा होणे अनेकांना गरजेचे वाटते.

गहू, तांदूळ, डाळी, मका अशा तृणधान्यांसाठी triazole हे कीटकनाशक मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. तसेच या पिकांमध्ये तण वाढू नयेत यासाठी dithiocarbamate हे तणनाशक वापरण्यात येते. काही तज्ज्ञांच्या मते कीटकनाशकांची व तणनाशकांची मात्रा योग्य प्रमाणात वापरण्यात आली तर ते हानीकारक ठरत नाही. त्यामुळे त्यांच्या मते असे बदल अयोग्य ठरू शकतील. स्वीडनमधील Syngenta या कंपनीच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या मते सध्याचे नियम बरेच कडक आहेत. शेतीक्षेत्रातील उत्पादन घटण्याची शक्यता असतानाही काही रसायनांचा वापर थांबविण्यात आला आहेच. यापूर्वी बाजारपेठत एकूण ११५० रसायने होती. आता त्यांची संख्या ७०० इतकी घटली आहे. अशा वेळी आणखी कडक नियम कशाला, असा प्रश्न ते उपस्थित करतात. कीटकनाशकांच्या व्यापारात सहभागी नसलेले ब्रिटनमधील अभ्यासकही असेच मत मांडतात. या संदर्भात युरोपीय देश नको इतकी कडक भूमिका घेत असून अशा वेळी काही कीटकनाशके बाजारपेठेतून बाहेर पडतील तर काही चांगली कीटकनाशकेही अडचणीत येऊ शकतात असा मुद्दा ते मांडतात. सध्याचे नियम चांगलेच असून त्यात बदल करण्याची आवश्कता नाही, असे प्रतिपादन ते करतात.

नियम कितीही चांगले असले तरी त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होत नसल्याने हे नियम काय उपयोगाचे, असा प्रश्न या बदलाचे समर्थक उपस्थित करीत आहेत. नियमांनुसार खाद्यान्नातील कीटकनाशकांचे प्रमाण जास्तीतजास्त किती असू शकेल हे ठरविण्यात आले आहे. पण ही मर्यादा नेहमीच ओलांडली जाते असे खाद्यपदार्थातील कीटकनाशकांचे अंश तपासले असता समजून येते, असे पर्यावरणवादी गटाचे म्हणणे आहे. सर्वसाधारणपणे दर पंधरा दिवसांनी एकदा तरी असे खाद्यान्न युरोपीय नागरिकांच्या आहारात येत असते, असे स्पष्ट करून हे कायदे व्यवहारात उपयोगात आणले जात नाहीत, असे या गटाचे प्रतिपादन आहे. या बदलाचे समर्थक असलेल्या एका वैद्यकीय तज्ज्ञाच्या मते आजघडीला हानीकारक घटकांच्या वापराबाबतचे कायदे चांगले असण्याचा दावा केला जात असला तरी वस्तुस्थिती तशी नाही. आपल्या परसबागेत भाज्यांचे पीक घेणाऱ्या नागरिकांचीही कीटकनाशकांपासून सुटका होत नाही. भेसळ होऊन वा इतर कोणत्या ना कोणत्या मार्गाने त्यांच्या परसबागेत कीटकनाशके प्रवेशण्याची शक्यता असते. ब्रिटनमधील एका नागरिकाने परसबागेसाठी जे खत वापरले त्यात Aminopyralid या तणनाशकाची भेसळ झाल्याकारणावरून त्याने परसबागेतील भाजी खाऊ नये असा सल्ला त्याला देण्यात आला होता.

Risk ऐवजी Hazard असा शब्दबदल करणे म्हणजे कीटकनाशकांचा वापर कमीतकमी व्हावा या दिशेने जाण्याची ती कृती ठरेल, किंबहुना, या बदलामागे मूळ कल्पना तीच आहे, असेही म्हटले जात आहे. या नव्या बदलामुळे हानीकारक अशा अनेक रसायनांचा वापरावर प्रतिबंध येईल आणि नागरिकांचे आरोग्य चांगले राहण्याच्या शक्यता वाढतील, असे बदलाच्या समर्थकांना वाटते. विशेषत:, गरोदर स्त्रियांसाठी हा बदल अधिक उपयुक्त ठरेल. कारण, हानीकारक अशा घटकांमुळे गर्भाचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.

असा बदल करण्यामागे विज्ञान आहे, हे खरे. पण त्याचबरोबर या विषयावर युरोपच्या राजकारणातही काही घडले. या विषयी चर्चा करण्यासाठी युरोपीय राष्ट्रांमधील कृषिमंत्र्यांची एक परिषद अलीकडेच आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी असे ठरविण्यात आले की ज्या देशांना एखाद्या विशिष्ट कीटकनाशकाचा वापर थांबविता येणार नाही त्या देशांनी तशी परवानगी कृषिमंत्रालयाकडे मागितली पाहिजे. यामुळे विविध देशांमधील पर्यावरणवादी व कृषिक्षेत्रातील संशोधक नाराज झाले आहेत. अशी सुविधा मागणे ही एकप्रकारे पळवाट असून यामुळे काहीच साध्य होणार नाही. शिवाय ही प्रशासकीय बाबींमध्ये अडकणारी वेळखाऊ प्रक्रिया ठरेल अशी टीका याबाबत करण्यात आली आहे.

या सर्व प्रकारातून एक गोष्ट ठळकपणे दिसून येते ती म्हणजे कोणत्याही निर्णयामुळे सदासर्वकाळ सर्वांनाच खुश ठेवता येणार नाही. कोणता तरी गट नाराज होणारच. तसेच स्वस्त, कीटकनाशकेविरहित आणि मुबलक अशा अन्नधान्याची निर्मिती अशा सर्व बाबी दरवेळी एकत्र आणता येतीलच असे नाही. अशा वेळी सुस्पष्ट असे एकच उत्तर सापडेल असेही नाही. मग धोरणकर्त्यांनी निर्णय तरी कसा घ्यावा ? यावर काहींचे उत्तर असे की, विज्ञानाच्या आधारे अशा प्रश्नांवर उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत राहावे. दुसरे म्हणजे, कधी काळी काही अप्रिय निर्णय घेणे अपरिहार्य ठरेल तेव्हा ते घ्यावे. पण कालांतराने ते निर्णय चुकल्यास ते बदलण्याची तयारी ठेवावी. धोरणकर्ते हे उत्तर मान्य करतील वा न करतील, पण युरोपमध्ये जैवतंत्रज्ञानाला झालेला विरोध, पर्यावरणाविषयी निर्माण होत असलेली जागरुकता व तेथील राजकारणाची दिशा यांमुळे Risk ऐवजी Hazard हा शब्द वापरण्याचा बदल होईल असा राजकीय तज्ज्ञांचा अंदाज आहे. हा बदल जे काही बरेवाईट परिणाम घडवून आणेल त्याला सामोरे जाण्याची तयारी सर्व संबंधित करतील, अशी आशा करता येईल. ✿✿

# टेलिप्रेझेन्स !

व्यापार-उद्योगासाठी आणि कंपन्यांच्या कामासाठी जगभर प्रवास करणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे होणारा कंपन्यांचा प्रवासखर्च कमी व्हावा यासाठी 'व्हिडिओ कॉन्फरन्सिग'ची पद्धत रूढ झालीच आहे. कामकाजाचा खोळंबा होऊ नये व त्याचबरोबर विमानप्रवासामुळे होणारे प्रदूषण टळावे, असेही एक उद्दिष्ट 'व्हिडिओ कॉन्फरन्सिग' मागे आहेच. तशाच प्रकारची पण अधिक चांगली व वास्तवाच्या अगदी जवळ जाणारी अशी 'टेलिप्रेझेन्स'ची सुविधा आता उपलब्ध झाली आहे.

विशेष तंत्रज्ञानाने युक्त अशी एक विशेष रूम 'टेलिप्रेझेन्स'साठी तयार करण्यात येते. नेहमीच्या 'व्हिडिओ कॉन्फरन्सिग'पेक्षा वेगळी अशी साधनसामग्रीची मांडणी या वेळी करण्यात येते. उदाहरणार्थ, समजा, एखाद्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी मुंबईत एका गोल टेबलाभोवती आठजण बसले आहेत. त्यांपैकी चार व्यक्ती अमेरिकेत आहेत. तर 'टेलिप्रेझेन्स'द्वारे ही चर्चा आयोजित करतेवेळी या सर्व व्यक्ती एकाच टेबलाभोवती बसल्या आहेत, असे दिसावे अशा पद्धतीने ही मांडणी केली जाते. म्हणजे परदेशांतील ज्या व्यक्ती चर्चेत सहभागी असतील त्या खरे तर पडद्यावरून इतरांशी संवाद साधत असतील आणि प्रत्यक्षात त्यांचे टेबल वेगळे असले तरी ते एकाच टेबलाचा अर्धवर्तुळाकार भाग असावा अशा पद्धतीने मांडले असते. समजा एखादी व्यक्ती अनुपस्थित असेल तर ती जागा रिक्त राहील व तसेच दिसेलही. अशी चर्चा एकाच खोलीत चालू आहे असे वाटावे यासाठी दोन देशांमधील खोल्यांचा रंग, पडदे आणि इतर सजावट 'मॅच' होणारी असेल. अशा वातावरणात संबंधित व्यक्ती आपण दोन देशांत आहोत हे सत्य विसरतात आणि आपण एका खोलीतच एकत्र आहोत असे समजून चर्चेत सहभागी होत जातात. चर्चेच्या वेळी परस्परांच्या नजरेला नजर देणे, आवाजातील चढउतार जोखणे व त्यानुसार चर्चा पुढे जाणे हे सारे सहजपणे घडत जाते. Teliris, Hewlett-Packard, Tandberg, Cisco, Polycom इत्यादी मोठ्या कंपन्या या प्रकारची सुविधा उपलब्ध करून देत आहेत. ही सुविधा सर्व स्तरांतील कर्मचाऱ्यांना उपयुक्त ठरते आहे. कंपन्यांचा प्रवासखर्च वाचण्यासाठी नवतंत्रज्ञानाचा असा उपयोग रुचण्यासारखाच आहे.

## सेल आणि सेन्सर

मोबाइल युगाचे एक बरे आहे. कोणी कुठे का असेना (अर्थात मोबाइलच्या रेंजमध्ये ! ) पण त्या व्यक्तीशी इतरांना संपर्क साधता येतो. सेलफोनसाठी उभारण्यात आलेल्या टॉवरच्या माध्यमातून कोण कुठे आहे याचा एक अदृष्य असा मार्गच जणू एवढेसे यंत्र आखत असते. असे करण्याने सेलफोन हा जणू सेन्सरच बनतो. Triangulation या पद्धतीचा अवलंब करून असा मागोवा घेणे शक्य होते. असा मागोवा घेणारी छोटी यंत्रे जर कुठे गुप्त ठिकाणी बसविता आली तर मोबाइलचा मार्ग समजून घेता येईल. सार्वजनिक ठिकाणी (सुरक्षेच्या दृष्टीने) असा मागोवा घेता येईल.

ब्रिटनमधील 'पाथ इंटेलिजन्स'ने या संदर्भात विमानतळे, संग्रहालये व मनोरंजन केंद्रे इत्यादी ठिकाणी संपर्क साधून या पद्धतीचा अवलंब करण्याबाबत विचारणा केली आहे. या अदृष्य मार्गाचा उपयोग करून घेण्यासाठी 'फूटपाथ' अशी एक यंत्रणाही कार्यान्वित करण्यात आली आहे. काही मॉल्समध्ये 'फूटपाथ'चा वापर करण्यात येत आहे. कारण जसजशी मॉलसंस्कृती उदयास आली तसतशी मॉलमध्ये रेंगाळणाऱ्या पावलांची संख्या हळूहळू वाढू लागली. मग अशी रेंगाळणारी पावले कुठे थबकतात, कशाचा शोध घेतात आणि कोणत्या वस्तूंकडे आकर्षित होतात, हे ग्राहकांच्या नकळत समजून घेणे ही मॉलच्या मालकांची गरज बनली. अशा माहितीचा उपयोग करून त्यांना व्यापारवृद्धीची धोरणे आखणे सोपे जात असावे. एकंदरीत, ग्राहकांची खरेदीमागील मानसिकता समजून घेऊन मॉल्समध्ये अनेकानेक प्रकारची उत्पादने उपलब्ध करून देता आल्यास मॉल्समध्ये येणाऱ्या ग्राहकांची गर्दी वाढेल, तसेच, उत्पादनांचा खपही वाढेल, असा अंदाज आहे. ✿✿

## संशोधक वळले हॉलीवुडकडे !

विज्ञानाची प्रगती होऊ लागली तसतसा त्याचा प्रभाव इतर अनेक क्षेत्रांत दिसून येऊ लागला. विशेषतः, चित्रपटांवर तर याचा फारच प्रभाव पडला. विज्ञान-तंत्रज्ञानामुळे तर चित्रपटउद्योग बहरला. स्टार वॉरसारख्या अनेक उत्तम विज्ञानचित्रपटांची निर्मिती एवढ्याचपुरता चित्रपटाने विज्ञानाचा उपयोग केला असे नाही, तर कलात्मक चित्रपटांच्या निर्मितीतही तंत्रज्ञानाचा फार मोठा उपयोग झाल्याचे दिसून येते. चित्रपटाची कथा, दिग्दर्शन, संवाद, कलाकारांचा उत्तम अभिनय इत्यादी अनेक बाबी चित्रपटाच्या यशासाठी महत्त्वाच्या ठरत असल्या तरी त्यात तंत्रज्ञानाचा व तंत्रज्ञांचा वाटाही मोठा व

महत्त्वाचा असतो. हे लक्षात घेऊन हॉलिवूडने नेहमीच विज्ञानक्षेत्राकडून नवनवीन कल्पना घेतल्या आहेत. पण आता नेमके त्या उलट घडते आहे. आयबीएम या कंपनीच्या संशोधकांची पावले आता नवीन कल्पनांसाठी हॉलिवुडकडे वळली आहेत. या संशोधकांची आणि USC School of Cinematic Arts येथील विद्यार्थ्यांची *'२०५०मधील जग कसे असेल'* या विषयावर अलीकडेच चर्चा झाली. जगासमोर उभ्या ठाकत असलेल्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी या दोन क्षेत्रांतील कल्पक व्यक्तींच्या चर्चांमधून काही निष्पन्न होऊ शकते का, याची चाचपणी करण्यासाठी ही प्राथमिक चर्चा होती. अशा प्रकारचे वैचारिक आदानप्रदान वाढावे हाही या चर्चेमागील एक हेतू होता. अशा चर्चांमधून अनेकानेक विषयांतील आता अशक्य वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात येऊ शकतील, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. ✿✿

---

**प्रमुख संदर्भ -** (1) Current History, April 2008, (2) Dharmaworld, Jan-March 2008 (3) Economist, 11 July 2008 (4) Electronics for you, June 2008


## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे नवे प्रकाशन

आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणाऱ्या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रु पये

**ग्रंथ घेणाऱ्यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१ जून २००६ पासून)

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## भाववाढ नेमकी किती ?... कशामुळे...?

- नीळकंठ रथ

गेल्या वर्षीच्या जून महिन्यात भाववाढीचा निर्देशांक जेवढा होता त्याच्या तुलनेत यंदाच्या जून महिन्यात भाववाढीचा निर्देशांक सुमारे १२ टक्क्यांनी उंचावल्याने सर्वच राजकीय पक्ष प्रक्षुब्ध झालेले आहेत. त्यातच, भाववाढीचा आजमितीस अनुभवास येत असलेला दर हा गेल्या १३ वर्षांतील सर्वोच्च आहे, असे ऐलान केले गेल्याने तर सर्वसामान्य माणूस आणि राजकीय पक्षोपपक्ष अधिकंच चिंतित दिसतात. भाववाढीबाबत बोलताना व्यवहारामध्ये भाववाढीचा निर्देश सरसहा 'चलनवाढ' या शब्दाने केला जातो. परंतु ते चुकीचे आहे. 'चलनवाढ' हा 'भाववाढ' या शब्दाचा पर्यायी शब्द नाही. चलनवाढ हे भाववाढीचे एक कारण मात्र निश्चितच आहे.

परंतु, शहरांमध्ये राहणारा सर्वसाधारण शहरी नागरिक मात्र अंमळ गोंधळलेलाच दिसतो. दैनंदिन जीवनासाठी आवश्यक भासणाऱ्या जिनसा खरेदी करण्यासाठी कुटुंबातील गृहिणी जेव्हा बाजारात जाते तेव्हा रोजच्या वापरासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या बाजारपेठीय किंमतींमध्ये एकाएकीच एवढी तीव्र भाववाढ घडून आल्याचा अनुभव मात्र शहरवासियांना वास्तवात येत नाही. गेल्या दोन वा तीन वर्षांच्या तुलनेत बाजारपेठेतील वस्तूंच्या किंमती सर्वसाधारणपणे वाढलेल्या आहेत हे खरे; परंतु, एका खाद्यतेलाचा अपवाद वगळता, अन्य जिनसांच्या किंमतींमध्ये अलीकडील काही महिन्यांत एकदमच तीव्र वाढ झालेली काही जाणवत नाही, अशीच याबाबत सर्वसाधारण गृहिणीची धारणा असल्याचे दिसते.

काही शहरवासियांची ही अशी समजूत असली तरी, वास्तवातील परिस्थिती नेमकी काय आहे ?

आपल्या देशात भाववाढीचा एक निर्देशांक दर आठवड्याला प्रसिध्द केला जातो. प्रसिद्ध झाला रे झाला की लगोलगच तो दैनिकांचे मथळे मंडित करतो. एकंदर अर्थव्यवस्थेतील सर्वच उत्पादनांच्या भावांमधील वाढीचा दर मोजण्यासाठी या निर्देशांकाची

योजना केलेली आहे. अन्नधान्ये तसेच अन्य शेतमाल आणि ग्राहकोपयोगी वस्तूंच्याव्यतिरिक्त देशात उत्पादन होणारे नाना प्रकारचे खनिज पदार्थ, सीमेंट, पोलाद, अन्य उत्पादनांच्या निर्मितीमध्ये वापरले जाणाऱ्या औद्योगिक जिनसा (इंटरमिजिएट प्रॉडक्ट्स), माहिती तंत्रज्ञानासारख्या नानाविध सेवा, ऊर्जानिर्मितीचे साधनस्त्रोत... यांसारख्या अन्य वस्तू व सेवांना या निर्देशांकात खूपच मोठा भारांक (Weightage) बहाल केलेला आहे. नानाविध प्रकारच्या औद्योगिक उत्पादनांचे निर्माते, औद्योगिक गुंतवणूकदार, पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या साधनसामग्री व जिनसांचे उत्पादक... यांसारख्या उद्योगव्यवसायातील घटकांना अर्थव्यवस्थेतील किंमत पातळीत दृग्गोचर होणाऱ्या एकंदर कलाची कल्पना येण्यास हा निर्देशांक उपयुक्त ठरतो.

परंतु, बाजारपेठीय किंमतींच्या ज्या वास्तवाशी अथवा परिस्थितीशी सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीचा संबंध हरघडी येत असतो, त्या किंमतीमधील कलांबाबतचे यथार्थ चित्र रेखाटण्यास मात्र हा निर्देशांक उचित आणि उपयोगी ठरत नाही. दैनंदिन गरजेच्या अनेकविध जिनसा वा सेवा बाजारातून खरेदी करण्यासाठी ग्राहकांना ज्या किंमती मोजाव्या लागतात त्यांवर पोलाद, सीमेंट, खनिजे वा अन्य वस्तूंच्या निर्मितीसाठी कच्चा माल या स्वरूपात वापरली जाणारी उत्पादने यांसारख्या उत्पादनांच्या किंमतींमधील चढउतारांचा थेट प्रभाव पडत नसतो. या वस्तूंच्या किंमतींमधील बदलांचा ग्राहकांवर होणारा संभाव्य परिणाम हा अप्रत्यक्ष आणि दीर्घकालीक अशा स्वरूपाचा असतो. घरबांधणीसाठी वापरल्या जाणाऱ्या सीमेंट वा पोलादासारख्या उत्पादक घटकांच्या किंमतींमध्ये वाढ घडून आल्याने नव्याने बांधण्यात येणाऱ्या निवासी घरांच्या बांधकाम खर्चात वाढ होऊन पर्यायाने घरभाड्यांचीही पातळी उंचावते आणि मग त्याची झळ सर्वसामान्य ग्राहकांना जाणवते, हे याचे एक उदाहरण.

एक ग्राहक म्हणून सर्वसामान्य माणसाचा ज्या बाजारभावांशी थेट आणि नित्याचा संबंध येतो त्या किंमतींमधील बदलांचे दर आठवड्याला वा दर महिन्याला दर्शन घडविणाऱ्या किंमत निर्देशांकास 'ग्राहक किंमत निर्देशांक' असे संबोधतात. असे एकंदर तीन ग्राहक किंमत निर्देशांक आपल्या देशात मौजूद असून त्यांची आकडेवारी भारत सरकारच्या श्रम विभागातर्फे नित्यनेमाने प्रकाशित केली जाते. (१) औद्योगिक कामगारांसाठीचा ग्राहक किंमत निर्देशांक (२) शेतमजुरांसाठीचा ग्राहक किंमत निर्देशांक आणि (३) ग्रामीण मजुरांसाठीचा ग्राहक किंमत निर्देशांक. किंमतींमध्ये दर महिन्यागणिक

होणाऱ्या बदलांचे एकसारखेच प्रतिबिंब या तीनही निर्देशांकांमध्ये स्वाभाविकपणेच पडत नाही. परंतु, या तीनही निर्देशांकांमधील बदलांचे कल मात्र सारखेच दिसतात. शेतमजुरांप्रमाणेच ग्रामीण मजुरांच्याही कौटुंबिक खर्चामध्ये अन्नधान्याचा भारांक हा तुलनेने अधिक असतो. साहजिकच, अन्नघटकांचा किंमत निर्देशांक ज्याप्रमाणे चढेल वा घसरेल त्यानुसार शेतमजूर तसेच ग्रामीण मजुरांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकामध्ये घडून येणारे चढउतार हे औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकामध्ये घडून येणाऱ्या चढउतारांपेक्षा अधिक वेगवान व तीव्र असतील. एकंदरच धोरणांच्या आखणी-निश्चितीमध्ये आपल्या देशात बव्हंशी संदर्भ घेतला जातो तो औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकाचाच. आणखी एका गोष्टीचे अवधान या ठिकाणी ठेवणे उपयुक्त ठरावे. अमेरिका वा ब्रिटन वा अन्य एखादा विकसित देश ज्या वेळी त्यांच्या त्यांच्या अर्थव्यवस्थेतील भाववाढीचा निर्देश करतात त्या वेळी ते ग्राहक किंमत निर्देशांकांमधील वाढीबद्दलच बोलत असतात. तेव्हा, उपरोक्त विविध ग्राहक किंमत निर्देशांकांची भाऊगर्दी प्रस्तुत लेखामध्ये करण्यापेक्षा भाववाढीच्या विश्लेषणार्थ इथे आपण औद्योगिक कामगारांसाठीचा ग्राहक किंमत निर्देशांकच चर्चेसाठी वापरू -

(१) या ठिकाणी प्रथमच एका वास्तवाची नोंद ध्यावयास हवी ती अशी की, औद्योगिक कामगारांसाठीच्या या ग्राहक किंमत निर्देशांकात २००६ आणि २००७या दोन वर्षांत (आधीच्या एक वर्षासाठीच्या सरासरी निर्देशांकाच्या तुलनेत) अनुक्रमे ६.२ टक्के आणि ६.५ टक्क्यांची वाढ घडून नोंदविली गेली होतीच. चालू वर्षातील पहिल्या पाच महिन्यांच्या कालावधीसाठीचा सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक गेल्या वर्षातील पहिल्या पाच महिन्यांच्या सरासरी निर्देशांकापेक्षा ६.९ टक्क्यांनी उंचावलेला दिसतो. २००६-०७ या वर्षातील पहिल्या पाच महिन्यांच्या कालावधीसाठीचा सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक त्या पूर्वीच्या वर्षातील पहिल्या पाच महिन्यांच्या कालावधीतील सरासरी ग्राहक किंमत निर्देशांकापेक्षाही ६.९ टक्क्यांनीच अधिक असल्याचे संबंधित आकडेवारी दर्शविते. किंबहुना, गेल्या वर्षीचे मार्च, एप्रिल व मे हे तीन महिने आणि या वर्षीचे मार्च, एप्रिल व मे हे तीन महिने अशी तुलना करून बघितले तर, ग्राहक किंमत निर्देशांक या कालावधीदरम्यान प्रत्येक महिन्यासाठी ७.५ टक्क्यांनी उंचावला असल्याचे संबंधित आकडेवारीवरून ध्यानात येते. संपूर्ण अर्थव्यवस्थेतील भाववाढीची परिस्थिती दर्शविणारा जो महागाई निर्देशांक वृत्तपत्रांतून नित्याने प्रकाशित केला जातो, त्याच्या तुलनेत ही भाववाढ खूपच कमी असल्याचे अनुभवास येते. केवळ इतकेच

नाही तर, औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकात आधीच्या दोन वर्षांच्या तुलनेत अधिक वेगाने वाढ घडून येत होती असेही अगदी चालू वर्षातील मे महिन्याच्या अखेरीपर्यंत आढळत नाही.

(२) संबंधित आकडेवारीचा अभ्यास करता आणखी एक रोचक बाब ध्यानात येते. औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकामध्ये गेली दोन वर्षे तसेच चालू वर्षातील पहिल्या पाच महिन्यांदरम्यान जी वाढ अनुभवास येते ती वाढ याच निर्देशांकामध्ये १९९० ते १९९८ या दरम्यान घडून आलेल्या वाढीच्या तुलनेत किती तरी कमी आहे. या नऊ वर्षांमध्ये औद्योगिक कामगारांसाठीचा सरासरी वार्षिक ग्राहक किंमत निर्देशांक ९ ते १४ टक्क्यांनी वाढला होता, असे या कालखंडातील आकडेवारीवरून मोजदाद करता ध्यानात येते. याला अपवाद केवळ दोन वर्षांचा - १९९३ आणि १९९७. या दोन वर्षी हा निर्देशांक अनुक्रमे ६.३ आणि ७.२ टक्क्यांनी वाढला होता. किंबहुना, ग्राहकांच्या दृष्टीने १९९०चे सारे दशकच उच्च भाववाढीचे होते. अपवाद केवळ १९९९ या वर्षाचा काय तो. १९९०च्या दशकादरम्यानची आपल्या देशातील भाववाढ गेल्या दोन ते अडीच वर्षांदरम्यान अनुभवास येत असलेल्या भाववाढीच्या तुलनेत खूपच अधिक होती.

(३) या नऊ वर्षांपैकीही, १९९१ ते १९९८ ही दोन वर्षे अधिक लक्षणीय ठरतात. या दोन वर्षांत बहुतेक काळ औद्योगिक कामगारांसाठीचे ग्राहक किंमत निर्देशांक हे त्या त्या वर्षाच्या आधीच्या वर्षातील त्या त्या महिन्यासाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकापेक्षा १४ ते जवळपास २० टक्क्यांनी अधिक होता, असे ध्यानात येते.

(४) पुढील काळासाठीचे चित्र मात्र वेगळे दिसते. १९९८ नंतरची सात वर्षे, म्हणजे, २००५ सालापर्यंतच्या कालावधीत औद्योगिक कामगारांसाठीचा सरासरी वार्षिक ग्राहक किंमत निर्देशांक दर वर्षी ३.६ ते ४.७ टक्क्यांनी वाढताना दिसतो. ग्राहकांच्या दृष्टीने सौम्य वा कमी चलनवाढीचा असा हा कालखंड होता.

या साऱ्या ऊहापोहावरून एक गोष्ट ध्यानात येते ती अशी की, शहरी ग्राहकाला ज्या चलनवाढीला गेल्या दोन-अडीच वर्षांत आणि विशेषत्वाने अलीकडील पाच महिन्यांत सामोरे जावे लागलेले आहे ती चलनवाढ १९९९० च्या दशकातील चलनवाढीइतकी नक्कीच नाही. १९९९ नंतरच्या सात वर्षांमध्ये जेवढी महागाई होती तिच्यापेक्षाही आजची महागाई दीडपट आहे. तसेच, या चलनवाढीचा दरही गेल्या दोन ते अडीच वर्षांदरम्यान फारसा हेलकावलेला नाही.

सगळ्यात आश्चर्य वाटण्याजोगी बाब अशी की, पंतप्रधानांचे कार्यालय, केंद्रीय अर्थमंत्रालय, नियोजन आयोग तसेच अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणी यापैकी कोणीही ही बाब सर्वसामान्य जनता व प्रसारमाध्यमांच्या नजरेस आजवर चुकूनदेखील आणून दिलेली नाही. खरे म्हणजे हे निवडणुकांचे वर्ष आहे आणि या गोष्टीचा खुलासा करणे ही वस्तुतः सत्ताधारी पक्ष व पक्षांच्या जिव्हाळ्याची बाब असावयास हवी. काहीही असले तरी, प्रचलित महागाईबाबत सर्वसामान्यांची असलेली धारणा आणि त्या धारणेमधून निपजणारे मानसिक व्यापारही त्यामुळे पायाशुद्ध होण्यास हातभार लागेल.

गेल्या दोन ते अडीच वर्षांतच ही भाववाढ कशामुळे जाणवते आहे ? आजमितीस या बाबत दोन कारणे सांगितली जातात. अन्नधान्याच्या किंमतींतील वाढ हे झाले त्यांतील पहिले कारण. तर, दुसरे कारण म्हणजे कच्च्या खनिज तेलाच्या बाजारभावांमधील वाढ. या उभय कारणांचा या ठिकाणी एकेक करून आपण परामर्श घेऊः

(१) गेल्या २१ वर्षांचा विचार केला तर असे दिसते की अन्नधान्याच्या (तृणधान्ये आणि डाळी) दरडोई उपलब्धतेमध्ये १९८६ सालापासून धीम्या गतीने घसरता कल आढळून येतो. केंद्रीय कृषी मंत्रालय अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेची जेव्हा मोजदाद करते त्या वेळी त्या त्या वर्षात देशात झालेले अन्नधान्याचे एकंदर उत्पादन प्रथम लक्षात घेतले जाते. त्यामध्ये अन्नधान्याच्या निव्वळ निर्यात/आयातीचा प्रभाव मिळविला जातो. या बेरजेत, भारतीय अन्न महामंडळाकडील अन्नधान्याच्या साठ्यांतील वध-घट अंतर्भूत केली जाते. या संपूर्ण बेरजेला मग त्या वर्षीच्या अंदाजित लोकसंख्येने भागून अन्नधान्याची दरडोई उपलब्धता काढली जाते. अन्नधान्याचे देशभरातील व्यापारी तसेच कुटुंबांकडील अन्नधान्य साठ्यांचा मात्र विचार उपलब्धतेच्या या मोजदादीमध्ये केलेला नसतो, हे इथे ध्यानात घ्यावयास हवे. अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेची या प्रकारे जी मोजदाद केली जाते तिच्यात देशभरातील नागरिकांनी तसेच कुटुंबांनी घरीदारी ग्रहण केलेल्या अन्नधान्याचा अंतर्भाव केलेला असतो. त्याचप्रमाणे, जनावरे व कोंबड्यांना खाऊ घातलेले अन्नधान्य आणि आहाराव्यतिरिक्त अन्य उपयोगांसाठी वापरलेल्या अन्नधान्याचाही समावेश दरडोई उपलब्धतेच्या गणितात केलेला असतो. अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेबाबतचा कल सातत्याने उतरता तर दिसतोच आहे, पण, गेल्या तीन ते चार वर्षांतील दरडोई उपलब्धता बघितली तर ती या कलरेषेच्याही खाली असल्याचे दिसते. २००५ सालच्या अखेरीपासून अन्नधान्याच्या

किंमतींमध्ये अनुभवास येत असलेल्या तुलनेने अधिक वाढीमागे हेच कारण असावे, असे दिसते. औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकामधील वाढीचा दर हा त्याच्यातील अन्नधान्य घटकाच्या किंमत निर्देशांकावर बव्हंशी अवलंबून असतो. औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकामधील वाढ जेव्हा अधिक असते त्या वेळी त्याच्यातील अन्नधान्य घटकाच्या किंमत निर्देशांकातील वाढ ही एकंदर निर्देशांकातील वाढीपेक्षाही अधिक असते. तर, औद्योगिक कामगारांसाठीच्या ग्राहक किंमत निर्देशांकातील वाढ जेव्हा सौम्य असते त्या वेळी त्याच्यातील अन्नधान्य घटकाच्या किंमत निर्देशांकातील वाढ ही एकंदर निर्देशांकातील वाढीपेक्षा कमी असते. तेव्हा ग्राहक किंमत निर्देशांकातील वाढ ही प्रामुख्याने अन्नधान्याच्या किंमतींमधील वाढीमुळे घडून येते. अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेमधील कल सातत्याने घसरता असल्याने परिणामी अन्नधान्याच्या किंमतींवर त्याचा ताण यावा, हे स्वाभाविकच ठरते. दरडोई उपलब्धतेमधील ही घट जितकी तीव्र तितकी अन्नधान्ये आणि अन्नपदार्थांच्या किंमतींमधील वाढ तीव्र. सगळ्यात मोठा मजेशीर भाग म्हणजे, भारतीय आणि चिनी लोकांचा आहार वाढलेला असल्यानेच जागतिक स्तरावर अन्नधान्याच्या किंमती वाढत आहेत असा कांगावा प्रथम अमेरिकेच्या अध्यक्षांनी आणि त्या पाठोपाठ लगोलगच अमेरिकी प्रशासनाने करताच, 'वाढत्या उत्पन्नाबरोबर भारतासारख्या गरीब देशाने अधिक खायला सुरुवात केली तर बिघडले कोठे ?' असे म्हणत आमच्या नियोजन आयोगाच्या उपाध्यक्षांनीही त्यांच्या सुरात सूर मिसळला ! देशांतर्गत अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेत वास्तवात घडून येत असलेल्या घसरणीशी विसंगत असेच हे सारे चर्वितचर्वण. आपल्या देशातील लोकांना उत्तरोत्तर घटत्या प्रमाणात अन्नधान्याची मात्रा उपलब्ध होते आहे, या वस्तुस्थितीचे उत्तरदायित्व घेणे त्यांना कदाचित नामुष्कीचे वाटत असावे !!

(२) अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेचा कल घटता असतानाच नागरिकांचे दरडोई वास्तव उत्पन्न सर्वसाधारणपणे वाढते असेल तर किंमतींची परिस्थिती अधिकच गंभीर बनते. गेल्या सुमारे दीड दशकादरम्यान नेमके हेच घडताना अनुभवास येते. दरडोई उत्पन्नात वर्षागणिक होणाऱ्या चढउतारांचे मान हे, अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेत वर्षागणिक होणाऱ्या चढउतारांपेक्षा अंमळ अधिक आहेत. परंतु, एकीकडे दरडोई वास्तव उत्पन्नातील चढता कल आणि दुसरीकडे अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेतील घटता कल असे चित्र असताना अन्नधान्याच्या किंमती आणि पर्यायाने

औद्योगिक कामगारांसाठीचा ग्राहक किंमत निर्देशांक सातत्याने चढतच राहणार, हे स्पष्ट आणि सरळ आहे. ज्या ज्या वर्षांत देशांतर्गत अन्नधान्याची दरडोई उपलब्धता तिच्यातील कलापेक्षाही खाली घसरेल आणि दरडोई वास्तव उत्पन्नातील वाढ तिच्यातील कलापेक्षाही अधिक राहील त्या त्या वर्षी किंमतींमधील वाढ ही अधिक असेल. गेल्या काही वर्षांत नेमके हेच घडते आहे.

(३) अन्नधान्याच्या दरडोई उपलब्धतेचे परिमाण हे भौतिक आहे तर, दरडोई उत्पन्न आणि त्यातील वाढ ही वास्तवातील मोजलेली असते. म्हणजेच, वास्तव उत्पन्नातील वाढीची मोजदाद करताना उत्पन्नवाढीमधील पैसाविषयक घटक वजा केलेला असतो. वस्तूंच्या बाजारपेठीय किंमती या चलन वा पैसाविषयक घटकांमुळेही प्रभावित होत असतात. बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या वस्तू तसेच सेवांच्या मात्रेत घडून येणाऱ्या अल्पस्वल्प बदलांच्या तुलनेत लोकांच्या हातात अधिक पैसा असेल, अथवा लोकांच्या खिशातील पैशात वाढ होत असताना बाजारपेठेतील जिनसांची मात्रा मात्र आहे तितकीच राहत असेल वा राहिली असेल तर वस्तू व सेवांच्या बाजारभावांमध्ये वाढ घडून येते. अलीकडील काळात ज्या गतीने भारतीय अर्थव्यवस्था वाढते आहे त्या गतीने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये ज्या वेगाने एकूण पैशाचा पुरवठा होणे अगत्याचे ठरते त्यापेक्षा अधिक गतीने भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये केल्या जाणाऱ्या एकूण पैशाच्या पुरवठ्यात वाढ होत असल्याचे संबंधित आकडेवारीवरून ध्यानात येते. परदेशी व्यावसायिकांनी व्यापार -व्यवसायासाठी आपल्या देशात डॉलरच्या रूपात आणलेल्या मोठ्या रकमांचे रूपांतरण रुपयांमध्ये घडवून आणण्याची सध्याची प्रक्रिया हे या मागील एक कारण होय. आपल्या अर्थव्यवस्थेत बाहेरून आलेले हे डॉलर रुपयांमध्ये परिवर्तित केले गेल्यानंतर साहजिकच अर्थव्यवस्थेमधील पैशाच्या एकंदरच पुरवठ्यात वाढ घडून येते. हा वाढीव पैसा नागरिकांच्या तसेच संस्थांच्या हातात पडल्यावर साहजिकच त्याचा विनियोग वस्तू तसेच सेवांच्या खरेदीसाठी केला जातो. लोकांच्या हातातील पैशाच्या मात्रेत वाढ घडून आल्याने ज्या गतीने जिनसांना असणारी मागणी वाढू लागते त्या गतीने अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांचा पुरवठा काही वाढू शकत नाही. परिणामस्वरूप अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांच्या बाजारभावांत वाढ होऊ लागते. साहजिकच, खनिजे व खनिज पदार्थ, धातू, सीमेंट आणि अन्य वस्तू व सेवांच्या निर्मितीमध्ये कच्चा माल म्हणून वापरले जाणारे उत्पादक घटक (इंटरमीजिएट प्रॉडक्ट्स्) यांच्या किंमती या अन्नधान्यांच्या किंमतींपेक्षा अधिक वेगाने वाढू लागतात.

अर्थव्यवस्थेतील पैशाच्या पुरवठ्यात घडून येणाऱ्या वाढीस प्रतिबंध करण्याचा भारतीय रिझर्व्ह बँकेस उपलब्ध असणारा एक उपाय म्हणजे अर्थव्यवस्थेतील रोखता काढून घेणे वा कमी करणे. डॉलरच्या पुरवठ्यात वाढ घडून आल्याने साहजिकच भारतीय चलनास म्हणजेच रुपयास असलेली मागणी वाढली आहे, वाढते आहे. याची परिणती डॉलरचे रुपयातील मूल्य घसरण्यात अलीकडील काळात झाल्याचे आपण अनुभवले. साहजिकच, परदेशांतून भारतामध्ये आयात केल्या जाणाऱ्या जिनसा आपल्यासाठी स्वस्त बनल्या तर, भारतामधून बाहेरच्या देशांना निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू या महाग बनल्या. भारताच्या निर्यातीवर या बाबीचा प्रतिकूल परिणाम झाला. असे घडूनही, अर्थव्यवस्थेतील भारतीय रुपयाच्या पुरवठ्याचे नियंत्रण करण्याच्या दृष्टीने भारतीय रिझर्व्ह बँकेने कोणत्याही प्रकारची पावले उचलली नाहीत. याचे कारण असे की, डॉलरच्या तुलनेत रुपया वधारल्याने परदेशांतून भारतामध्ये आयात केले जाणारे कच्चे खनिज तेल आपल्याला स्वस्त पडू लागले. आयात तेलाची मोजावी लागणारी किंमत आपण डॉलरमध्ये अदा करतो. डॉलरचे रुपयातील मूल्य घसरल्याने स्वाभाविकपणेच आयात केले जाणारे खनिज तेल आपल्याला स्वस्त पडू लागले. परंतु, त्याच वेळी भारतीय रिझर्व्ह बँकेने हस्तक्षेप न करण्याची परिणती वस्तूंच्या सर्वसाधारण किंमतींमध्ये वाढ होण्यात झाली. व्यवहारात असलेली रोखता काढून घेण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने पावले उचलली असती तर त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेतील पैशाच्या एकंदर पुरवठ्याचे आकुंचन होण्यात झाला असता. साहजिकच, त्यामुळे डॉलरचे रुपयातील मूल्य वधारून परिणामी बाहेरच्या देशांमधून भारतामध्ये आयात केल्या जाणाऱ्या वस्तू आपल्याला महागात पडल्या असत्या -मुख्यत्वेकरून आयात कच्चे खनिज तेल.

(४) देशात निर्माण होणाऱ्या वा आवश्यकता भासणाऱ्या बहुतांश शेती उत्पादनांच्यासंदर्भात मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराचे तत्व आपल्या देशात लागू होत नाही. परंतु, नाना प्रकारच्या शेतमालाची निर्यात तसेच आयात मात्र आपण करत असतो. ग्राहकांच्या मागणीमध्ये विशेषत्वाने डोकविणाऱ्या खाद्य तेले आणि डाळी, कारणपरत्वे गहू यांसारख्या जिनसा आपण बाहेरच्या देशांकडून आयात करतो. तर, मर्यादित प्रमाणात आपण तांदळाची निर्यात करतो. देशांतर्गत बाजारपेठेत या जिनसांचा जेव्हा जेव्हा तुटवडा भासतो त्या त्या वेळी आपण एकतर या वस्तूंची आयात अधिक प्रमाणात करतो वा त्यांची निर्यात आखडती घेतो. खाद्य तेल आणि डाळींची आयात

तर आपण नित्यनेमानेच करत असतो. परंतु गेल्या दोन वर्षांत, खाद्य तेले तसेच तेलबियांच्या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अत्यंत लक्षणीय पद्धतीने वाढल्याचे आपण अनुभवतो आहोत. तृणधान्यांच्या किंमतींबाबतही हाच प्रकार आढळून येतो. या मागील कारणे दोन : कमालीच्या प्रतिकूल हवामानापायी, अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलिया यांच्यासारख्या गहू तसेच सोयाबीनच्या मोठ्या आणि महत्वाच्या उत्पादक देशांना या जिनसांच्या उत्पादनाच्याबाबतीत अतिशय मोठा फटका बसला. या दोन कृषी उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील हेच दोन मोठे पुरवठादार असल्याने एकंदर उत्पादनातच घट आल्याने साहजिकच त्यांच्या निर्यातीमध्येही घट घडून आली. परिणामी, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील पुरवठ्यावरही याचा ताण येऊन या दोन उत्पादनांच्या किंमतींमध्ये वाढ झाली. या दोन जिनसांचे बाजारभाव चढले. दुसरे म्हणजे, कच्च्या खनिज तेलाच्या किंमतींमध्ये जागतिक स्तरावरच वाढ घडून येत असल्याने काही प्रकारच्या तृणधान्यांचा तसेच तेलबियांचा वापर इथेनॉल निर्मितीसाठी करण्याबाबतची धोरणे अनेक विकसित देशांनी अंगिकारली. डिझेलच्या ऐवजी इथेनॉलच्या वापरास प्रोत्साहन देणारी धोरणे व्यवहारात आणली. अमेरिका यात बिनीवर आहे. याचा परिणाम असा झाला की, मका आणि सोयाबीन या दोन पिकांचे उत्पादन इथेनॉलच्या निर्मितीकडे वळविले गेले. साहजिकच, या दोन जिनसांच्या बाजारपेठेतील मागणी-पुरवठ्याचे चित्र पालटले. आहारात वापर होण्याबरोबरच इथेनॉलच्या उत्पादनासाठीही या वाणांचा वापर सुरू झाल्याने पुरवठ्याच्या तुलनेत मागणी वाढून त्यांच्या किंमती वाढल्या. 'अन्न' या स्वरूपात त्या आता अधिक महाग बनल्या. खाद्य तेल, गहू आणि मक्यासारखी तृणधान्ये यांच्या बाजारभावांमध्ये तीव्र वाढ होण्यात या साऱ्याची परिणती झाली. तांदूळही यास अपवाद ठरला नाही. या शेतमालांच्या बाजारभावांत आंतरराष्ट्रीय पातळीवरच झालेल्या वाढीची झळ लागण्यापासून आपण संपूर्णपणे मुक्त राहू शकणार नाही, कारण, आमची देशांतर्गत गरज भागविण्यासाठी या जिनसा आम्ही मोठ्या मात्रेने आयात करत असतो.

(५) कच्च्या खनिज तेलाच्या किंमतींमध्येही अगदी अलीकडील महिन्यांत अपूर्व अशी वाढ घडून आली आहे. कच्च्या खनिज तेलाच्या आयातीपोटी आम्हांला कराव्या लागणाऱ्या खर्चात त्यामुळे भरीव वाढ झाल्याचे आम्ही अनुभवतो आहोत. खनिज तेलाच्या या भाववाढीची झळ सर्वसामान्य ग्राहकांना पोहोचू नये यासाठी सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांना तोटा सहन करण्यास आमचे सरकार भाग पाडते आहे. परंतु, हे प्रयत्न चिरस्थायी असू वा होऊ शकत नाहीत. त्यामुळे डिझेल आणि

पेट्रोलच्या किंमती वाढल्या आहेत, आणि त्या वाढल्याच पाहिजेत. पेट्रोल आणि डिझेलसारख्या इंधनांच्या किंमती वाढल्याने वाहतुकीच्या खर्चात वाढ घडून यावी, हे ओघानेच आाले. परंतु, त्याचबरोबर गॅस, रासायनिक खते, वीज, कृत्रिम धाग्यांपासून बनविलेली सर्व प्रकारची उत्पादने, औषधे यांसारख्या नानाविध वस्तूंच्या उत्पादन खर्चावरही खनिज तेलाच्या दरवाढीचा प्रभाव जाणवल्याखेरीज राहणार नाही.

अन्नधान्यांच्या किंमतींमधील वाढ आणि कच्च्या खनिज तेलाच्या किंमतींमधील वाढ आणि त्या वाढीस कारणभूत ठरणाऱ्या घटकांमध्ये फरक आहे. या दोन जिनसांमध्ये घडून आलेली वा येत असलेली वाढ ही तंतोतंत एकसारखी नाही, या बाबीची नोंद आवर्जून घ्यावयास हवी. प्रतिकूल हवामानापायी पिकांची घडून येणारी हानी, ही काही चिरस्थायी स्वरूपाची परिस्थिती असू शकत नाही. एखाद-दुसऱ्या वर्षी वाईट हवामानाचा फटका बसतो, नाही असे नाही. परंतु, यथावकाश हवामान पालटते, सुधारते. हवामान अनुकूल बनल्यानंतर स्वाभाविकपणेच शेतीची परिस्थितीही सुधारते. उत्पादनाची मात्रा मूळ पदावर येते. परिणामी, बाजारपेठेतील पुरवठ्याचे मान सुधारते, उंचावते. साहजिकच, घटलेल्या वा अपुऱ्या पुरवठ्यापायी तापलेल्या किंमत आघाडीवर सौम्यता येते. दीर्घकालीन परिस्थितीचा विचार करता, पिकांच्या वाणांमधील सुधारणा, सिंचनासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याचा अधिक चांगला आणि कार्यक्षमतेने व काटकसरीने केलेला वापर, रासायनिक खतांऐवजी जैविक खतांचा अंगीकार यांसारख्या सुधारणा शेतीमध्ये राबविल्या जाणे शक्य होते. या सगळ्या सुधारणांची परिणती ही सिंचनाखालील क्षेत्राचे आकारमान वाढण्याबरोबरच कमी खर्चिक परंतु अधिक चांगल्या वाणांच्या पिकांचे उत्पादन शक्यतेच्या आवाक्यात येण्यात होते. तेलाधिष्ठित अशी रासायनिक खते स्वस्त दरांनी उपलब्ध होत आलेली असल्याने या खतांना पर्याय ठरू शकणाऱ्या जैविक खतांकडे आम्ही आजवर दुर्लक्षच केलेले आहे. आगामी भविष्यात या साऱ्या वा यापैकी काही बाबी यथावकाश वास्तवात उतरून शेतीजन्य उत्पादनांचा पुरवठा दीर्घकालात वाढण्यास वाव आहे, हाच या सगळ्या ऊहापोहाचा इत्यर्थ.

परंतु, कच्च्या खनिज तेलाच्याबाबतीत मात्र हे तर्कशास्त्र लागू करता येणार नाही. अखेर ते खनिज आहे आणि साहजिकच भूगर्भातील त्याचे साठे कधी ना कधी संपुष्टात हे येणारच. खनिज तेलाच्या उत्पादनाने सर्वोच्च पातळी गाठली आहे किंवा कसे (पीक ऑइल) यांबाबत आजमितीस उभ्या जगात अत्यंत गंभीरपणे चर्चा सुरू आहे. खनिज तेलाच्या उत्पादनाने सर्वोच्च पातळी गाठणे याचाच अर्थ यापुढे जागतिक

स्तरावर तेलाचे दैनिक वा वार्षिक उत्पादन यापुढे अधिक वाढणे शक्य नाही. एकदा का तेलाच्या उत्पादनाची ही पातळी गाठली गेली असेल तर पुढील काळात तेलाच्या उत्पादनात आणि पर्यायाने त्याच्या उपलब्धतेत संभवते ती केवळ घसरणच. उत्तर समुद्रासारख्या तेलउत्पादन व पुरवठ्याच्या महत्वाच्या स्त्रोतांनी तेलाच्या उत्पादनात घट नोंदविलेली आहे. सौदी अरेबियातील तेल विहिरींसारख्या खनिज तेलाच्या ज्ञात आणि मुबलक साठ्यांमधून केल्या जाणाऱ्या तेलाच्या उपशाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न करणे हे अतिशयच महागडे ठरेल अथवा ठरावे. खनिज तेलाची किंमत उच्च पातळीवर असली तरच हा खर्च किफायतशीर ठरतो वा ठरेल. मात्र त्याचबरोबर, तेथील भूगर्भात असलेल्या तेलसाठ्यांचा ऱ्हासही यामुळे अधिक वेगाने घडून येईल, हे विसरता कामा नये. ब्राझीलच्या किनारपट्टीपासून आत, ॲमेझॉन परिसरात भूगर्भात नव्यानेच गवसलेल्या प्रचंड तेलसाठ्यांमधूनही तेल उपसून काढण्यासाठी भूगर्भात खोलवर खोदाई करण्यास योग्य अशा अतिशय महागड्या आणि विशेष प्रकारच्या उपकरणांची व यंत्रसामग्रीची आवश्यकता आहे. खनिज तेलाचे बाजारभाव चांगले उंचावलेले असतील तरच एवढे कष्ट आणि एवढी गुंतवणूक समर्थनीय ठरेल. या सगळ्यात ध्यानात ठेवण्याचा मुद्दा एवढाच की, अन्नधान्याच्या किंमतींमधील वाढ प्रवासाची आपली दिशा जशी बदलू शकते तसे काही खनिज तेलाच्या किंमतींबाबत शक्य नाही. नायजेरियामधील संप अथवा पश्चिम आशियातील युद्धाची शक्यता यांसारख्या स्थानीय कारणांमुळे तेलांचे बाजारभाव तेल किंमतींच्या चढत्या कलरेषेच्या वर अथवा खाली जा -ये करताना दिसतात. परंतु, खनिज तेलाच्या किंमतींचा कल हा चढताच आहे, किंमतींच्या कलाची रेषा ही ऊर्ध्वगामीच आहे आणि तिची दिशा ही अपरिवर्तनीय आहे या वास्तवावरून मात्र आपली दृष्टी यामुळे ढळता कामा नये. खनिज तेलासारखा महत्वाचा जिन्नस उत्तरोत्तर अधिकाधिक महागच होत जाणार या वास्तवाची योग्य ती दखल घेत जगाला आपल्या अर्थव्यवस्थेची पुनर्मांडणी करणे भाग आहे. खनिज तेलास पर्याय ठरू शकणाऱ्या ऊर्जास्त्रोतांचा शोध जागतिक अर्थव्यवस्थेला लागल्यानंतर सुदूर भविष्यात खनिज तेलाच्या किंमती उतरणे शक्य आहे. खनिज तेलाच्या किंमतींमध्ये अलीकडील काळात अनुभवास येत असणारी वाढ पर्यायी ऊर्जास्त्रोतांच्या शोधयात्रेस प्रखर प्रेरणा देणारी ठरू शकेल, वा ठरावी.

भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता, अर्थव्यवस्थेतील एकंदर पैशाचा पुरवठा नियंत्रित करण्याच्या दिशेने पावले उचलणे, उचित अशी उपाययोजना कार्यान्वित

करणे हे भारतीय रिझर्व्ह बँकेस शक्य आहे. तशा प्रकारची उपाययोजना रिझर्व्ह बँकेने योजावयासही हवी. सिंचनासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याचे वाटप -वितरण अधिक काटेकोरपणे, कार्यक्षमतेने आणि सूत्रमय पद्धतीने व समंजसपणे घडवून आणण्यासाठी केंद्र सरकार तसेच देशभरातील राज्य सरकारांनी उचित अशी कार्यवाही करावयास हवी, योग्य ती पावले उचलावयास हवीत. याच्या जोडीनेच, शेतमालाच्या सुधारित वाणांच्या विकाससाठी शेतीक्षेत्रातील संशोधनास ठोस चालना देणे, त्याचप्रमाणे जैविक खतांच्या वापराबाबत प्रचार-प्रसार करण्याबाबत सरकारी पातळीवर प्रयत्न करण्याचीही निकड आहे. परंतु केवळ इतकेच पुरेसे नाही. खनिज तेल तसेच रासायनिक खतांबाबत सरकारला तर्कशुद्ध आणि समंजस असे धोरण आखून त्याचा अंगीकार करावा लागेल. खतांपोटी द्याव्या लागणाऱ्या अनुदानांचा भार कायमस्वरूपी वाहणे शक्य होणाऱ्यातील नाही. तेव्हा, अनुदानांच्या या भारभूत धोरणाला क्रमाक्रमाने सोडचिठ्ठी देता येणे शक्य होईल, अशा प्रकारचे खनिज तेल तसेच रासायनिक खतांबाबतचे धोरण आखून त्याची अंमलबजावणी करणे, हे सरकारला करणे क्रमप्राप्तच ठरेल. अशा प्रकारचे धोरण वास्तवात साकारले तर सायनिक खतांना उचित असे पर्याय व्यवहारात अवलंबण्याकडे शेतकऱ्यांचे मन वळविता येईल. याचे दुहेरी फायदे होतील. एक तर रासायनिक खतांवरील अनुदानांचा सरकारी तिजोरीवर पडणारा भार हटेल; आणि दुसरे म्हणजे यामुळे सिंचनासाठी उपलब्ध असलेल्या पाण्याचा अतिशय काटेकोरपणे, काटकसरीने आणि कार्यक्षमतेने पुरवठा व वापर करण्यावाचून गत्यंतर राहणार नाही. परिणामी, उपलब्ध पाण्याचा असा काटेकोर वापर करण्याची शिस्त अंगी बाणवून घ्यावी लागेल. गेल्या चार वर्षांच्या कालावधीदरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खनिज तेलाच्या बाजारभावांत जेव्हा जेव्हा वाढ घडून आली त्या त्या वेळी डिझेल, पेट्रोल व स्वयंपाकाच्या गॅससारख्या तेलजन्य जिनसांच्या देशांतर्गत किंमतींत अनुरूप वाढ घडवून न आणण्यात सरकारच्या ठायी सुज्ञतेचा अभावच प्रत्ययास आला. खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खनिज तेलाच्या किंमतींत जेव्हा जेव्हा आणि जसजशी वाढ घडून येईल त्या त्या वेळी त्या भाववाढीशी सुसंगत अशी तेलजन्य जिनसांची दरवाढ देशांतर्गत बाजारपेठेत वेळोवेळी न करता प्रदीर्घ काळानंतर लागू केलेली अचानक आणि तीव्र भाववाढ ही अनिष्ट आणि हानिकारकच ठरते. म्हणूनच, तेल तसेच तेलजन्य उत्पादनांच्या उच्च किंमतींच्या अमदानीस सामोरे जाण्यासाठी अर्थव्यवस्थेस क्रमाने सुसज्ज बनविणे हेच इष्ट. ✿✿

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

■ **Growth and Development in Emerging Market Economics : International Private Capital Flows, Financial Markets and Globalization, Edited by - Harinder S. Kohli, Sage Publications India Pvt. Ltd., New Delhi - 110 044, First Published in 2008, PP. 369, Price - Rs. 695/-**

आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान राखण्यासाठी प्रत्येकच देशाला भांडवलाची निकड ही भासत असतेच. विकसनशील देशांना खास करून या बाबतीत जाणवणारी अडचण अशी की, आवश्यक त्या गुंतवणूकयोग्य भांडवलाची ही निकड बचतीच्या देशांतर्गत संचयाद्वारे भागू शकत नाही. परिणामी, परकीय भांडवलावरील या देशांचे अवलंबन हा त्यांचा स्थायीभाव बनतो. परकीय भांडवलाचे स्त्रोत दोन. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, विभागीय विकास बँका, युरोपीय समुदाय... यांसारखे अधिकृत बहुपक्षी वा अनेकपक्षी संस्था-संघटनांच्या माध्यमातून मदतीच्या रूपाने अर्थव्यवस्थेत प्रवेशणारे परकीय भांडवल हा झाला पहिला स्त्रोत. तर, परकीय खासगी भांडवलदारांकडून थेट गुंतवणुकीद्वारे अथवा समभागांतील गुंतवणुकीद्वारे येणारे भांडवल हा झाला दुसरा प्रवाह. १९९० च्या दशकापर्यंत खासगी गुंतवणुकीचा बहुतांश ओघ हा आशिया व लॅटिन अमेरिकेतील काही मोजक्याच देशांकडे वाहत होता. आजमितीस ही परिस्थिती पालटत आहे. हे बदल उभय स्वरूपांचे आहेत. एकतर, संस्थात्मक प्रवाहांपेक्षाही खासगी गुंतवणुकीद्वारे विकसनशील देशांकडे वळणारे परकीय भांडवल हा परदेशी भांडवलाचा तुलनेने बलवान स्त्रोत ठरत आहे. दुसरे म्हणजे, परकीय भांडवल स्वत:कडे आकर्षित करण्यात काहीच मूठभर विकसनशील देशांची असणारी मक्तेदारी हळूहळू इतिहासजमा होत आहे. आर्थिक प्रगती तसेच विकासाच्या आघाडीवर चमकदार कामगिरी बजावण्याबरोबरच, आर्थिक सुधारणांच्याबाबतीतही लक्षवेधी टप्पा गाठणाऱ्या सर्व खंडांतील विकसनशील देशांच्याकडे परकीय भांडवलाचा ओघ वळतो आहे. या अर्थव्यवस्थांचा निर्देश उभरत्या बाजारपेठीय अर्थव्यवस्था (इमर्जिंग मार्केट इकॉनॉमीज्) अशा शब्दांत केला जातो. या अर्थव्यवस्थांमध्ये या अनुषंगाने होत असलेल्या सर्वगामी बदलांचे चित्रण प्रस्तुत ग्रंथात शब्दबद्ध केलेले आहे. ■■

RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: L-2/RNP/PNW/M 125/2007-2009
Licensed to Post Without Prepayment, LICENCE NO. LWP-228
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•विकास चित्रे •अभय टिळक •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी
•सुहास पळशीकर •रमेश पानसे •मनोहर भिडे •योगेंद्र यादव •नीळकंठ रथ
•व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**